नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १५२ * * अमरावती * शुक्रवार, दिनांक ५ डिसेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## दिल्लीतील प्रदुषणावर कारवाई करा

सोनिया गांधीची सरकारकडे आग्रही मागणी



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४ :
काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी केंद्र सरकारला दिल्लीतील प्रदूषणावर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

त्या म्हणाल्या, मुले मरत आहेत आणि वृद्धांनाही श्वास घेण्यास त्रास होत आहे. सद्धया प्रदुषणाची स्थिती अत्याधिक बिकट आहे. कारवाई करण्याची जबाबदारी सरकारची आहे. पंतप्रधानांनी विधाने करणे थांबवावे आणि समस्या सोडवावी.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## समाजवादी स्वयंसेवक

आजकाल माणसे खूप वाढलेली आहेत. पुढारी तर पायलीचे ५० झालेले आहेत. पण आयुष्यभर एका विचाराची पालखी घेऊन निष्ठेने अखेर पर्यंत समाजवादी विचारांची बांधिलकी असणारे पन्नालाल सुराणा यांच्यासारखा हिरा आपल्या देशाने गमावला आहे. महात्मा गांधी यांच्या विचारांचे पाईक झाल्यावर १९४२ साली लहानशा वयात पन्नालाल सुराणा चलेजाव आंदोलनामध्ये सक्रिय झाले. त्यानंतर स्वातंत्र्याच्या आंदोलनात त्यांनी स्वतःला पूर्णपणे झोकून दिले. समाजवादी विचारांचे पाईक असल्यामुळे ते राष्ट्रसेवा दलात सामील झाले होते. विनोबाजींच्या भूदान यज्ञासोबत त्यांच्या निष्ठा कायम होत्या, भूदान यज्ञामध्ये त्यांनी सहभाग घेतला होता. पन्नालालजी सतत फिरतीवर असत, अतिशय साध्या सोप्या आणि सौम्य शब्दात विचारांची मांडणी करणाऱ्या गांधीवादाचा जिवंत साक्षीदार, आपल्या वेळेचा सदैव करणारे सदुपयोग करणारे त्यांचे नियोजन अगदी आदर्शवत असे होते. आजकाल काळवेळ पाहून भूमिका बदलणारे राजकारणी हे आपण दररोज पाहतो. आज एका पक्षात, उद्या दुसऱ्या पक्षात त्यानंतर पुन्हा जुन्या पक्षात आणि तिथेही जमले नाही. तर पुन्हा तिसऱ्या पक्षात असे दिवसा दिवसाला पक्ष बदलणारे पक्षबदलू पाहिल्यावर राजकारण किती घाणेरडे झालेले आहे, हे आपण पाहतो. सत्ता आणि पैसा याच्यासाठी आपले स्थानच नाही तर मायबापही विसरणारे आजचे आरामबाज नेते पाहिले म्हणजे पन्नालालजी यांच्यासारख्या व्यवस्थे विरुद्ध लढणारा लढवय्या ही एक काल्पनिक कथा वाटते. पन्नालालजी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता याचे जिवंत प्रतिक होते. त्यांची अत्यंत साधी राहणी उच्चतम विचार, त्यासोबतच त्यांचा साध्या एसटी बसने केला गेलेला प्रवास आजच्या काळात वाचणारांना स्वप्नवत वाटेल. परंतु सामान्य लोकांचे सामान्यपण जगणारा मोठा माणूस म्हणूनही पन्नालालजी नेहमीच आदर्शवत वाटतात. कोणे एके काळी संघाचे स्वयंसेवक असेच वागत. संघाच्या स्वयंसेवकांना तसे वागताना आम्ही आमच्या डोळ्यांनी पाहिलेले आहे. गेल्या दशवार्षिक योजनेत असे वागणारे स्वयंसेवक आता हाताच्या बोटावर मोजण्या इतकेही शिल्लक आहेत की, नाहीत हा प्रश्न आम्हाला आता भेडसावतो आहे. स्वतः पन्नालालजी जुन्या काळाचे समाजवादी स्वयंसेवक होते असे म्हटल्यास ते वावगे ठरू नये. त्यांच्या वाणीत सरस्वती होती, लेखणीत सुद्धा सरस्वती होती. पण हे सर्व बोलताना किंवा लिहिताना त्यांच्यातील समाजवादी विचारवंत सदैव जागरूक असे. साने गुरुजी कथा मालिकेचे अध्यक्ष, दैनिक मराठवाडा वृत्तपत्राचे संपादक आणि त्या अनुषंगाने त्यांनी केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे. आणीबाणीच्या काळात त्यांना जेल यात्राही करावी लागली. त्यांनी शेतकरी, कामगार आणि कष्टकरी यांच्या अधिकारासाठी आंदोलन करण्यासाठी कधीच मागेपुढे पाहिले नव्हते. काही वर्षांपूर्वी लातूरमध्ये जेव्हा भूकंप झाला तेव्हा तेथील अनाथ मुलांसाठी त्यांनी 'आपले घर' नावाची शाळा सुरू केली होती. जलसंरक्षण कामाच्या बाबतीत ते आघाडीवर होते. वंचितांचे वकील म्हणून ते निवडणुकीतही उतरले होते पण जनतेने त्यांना निवडून दिले नाही हे जनतेचे दुर्भाग्य. एकूणच पन्नालाल सुराणा यांनी किती वेगवेगळ्या भूमिका पार पाडल्या, याचे विश्लेषण केल्यावर हा माणूस किती महान होता याचे दर्शन घडते. लेखक म्हणून त्यांनी आपली पत्नी वीणा पुरंदरे यांची चरित्र कथा लिहिली, गांधीजींच्या विचारांची जगाला ओळख करून दिली. कारगिल युद्धाच्या वेळी त्यांनी भारताच्या संरक्षण सिद्धतेवर लिहिले. ज्ञानोबाचे अर्थकारण, जागतिकी करणाची फसवणूक, महात्मा गांधी आणि दलित समस्या, शहा आयोगाचा शोध आणि बोध ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. आमच्या मारवाडी फाउंडेशनच्या कडून प्रबोधनकार ठाकरे यांच्या नावे दिला जाणारा प्रबोधनकार ठाकरे समाज प्रबोधन पुरस्कार त्यांनी स्वीकारला हे आमचे भाग्य आहे. अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाने या जगाचा निरोप घेतला. संपूर्ण जीवन आपल्या मनाप्रमाणे जगलेल्या अशा समाजवादी, निष्ठावादी व्रतस्थाला वंदन आणि भावपूर्ण श्रद्धांजली!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचे

# भारतात आगमन!

पंतप्रधान मोदींनी पुतिनला मिठी मारली : विमानतळावर लाल कार्पेट अंथरून स्वागत : सन्मानार्थ खासगी डिनर

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४ :
रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन भारतात आले आहेत. रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर त्यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. पंतप्रधान मोदी त्यांच्या स्वागतासाठी त्यांच्या ताफ्यासह विमानतळावर पोहोचले.

पुतिन हे विमानातून खाली उतरताच प्रधानमंत्री मोदी यांनी त्यांना मिठी मारली. मोदी आज संध्याकाळी त्यांच्या सन्मानार्थ एका खासगी डिनरचे आयोजन केले. पुतिन सुमारे ३० तास



भारतात राहतील.

मोदी म्हणाले, माझे मित्र, राष्ट्रपती पुतिन यांचे भारतात स्वागत करताना मला आनंद होत आहे. भारत-रशिया मैत्री कठीण काळाच्या कसोटीवर उतरली आहे आणि आपल्या लोकांना प्रचंड फायदे मिळवून दिले आहेत.

पुतिन भारतात येण्यापूर्वी अनेक रशियन उपपंतप्रधान डेनिस मंटुरोव, संरक्षण मंत्री सर्गेई शोइगु आणि कृषी मंत्री दिमित्री पेट्रोव्ह दिल्लीत पोहोचले आहेत.

## एका वर्षात संपतील महामार्गावरील टोल बूथ

गडकरीचा दावा : बॅरियर लेस प्रणाली लागू



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४ :
केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी लोकसभेत सांगितले की, पुढील एका वर्षात महामार्गावरील सध्याची टोल वसुली प्रणाली बंद होईल. त्याऐवजी पूर्णपणे इलेक्ट्रॉनिक, बॅरियर-लेस टोल प्रणाली लागू केली जाईल.

ते म्हणाले की, नवीन प्रणालीची सुरुवात सध्या १० ठिकाणी करण्यात आली आहे आणि एका वर्षाच्या आत ती संपूर्ण देशात लागू करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यांनी सांगितले की, सध्या देशभरात सुमारे ४५०० महामार्ग प्रकल्प सुरू आहेत, ज्यांची एकूण किंमत अंदाजे १० लाख कोटी रुपये आहे.

आधी टोल प्लाझावर गाड्यांना थांबून रोख किंवा कार्डने पैसे भरावे लागत होते, नंतर ऋअरळॅ आल्याने थांबण्याचा वेळ कमी झाला, आता पुढील पाऊल बॅरियर-लेस म्हणजेच बॅरियर नसलेल्या हायटेक टोलच्या दिशेने आहे.

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने नॅशनल इलेक्ट्रॉनिक टोल कलेक्शन कार्यक्रम तयार केला आहे. हे संपूर्ण देशासाठी एकसमान आणि परस्परांशी जोडलेले इलेक्ट्रॉनिक टोल प्लॅटफॉर्म आहे. याचा उद्देश वेगवेगळ्या महामार्गांवरील वेगवेगळ्या प्रणालींची अडचण दूर करणे आणि एकाच तंत्रज्ञानाने टोल वसूल करणे हा आहे.

या प्रणालीचा मुख्य भाग आहे, जो रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन तंत्रज्ञानावर आधारित टॅग असतो आणि तो वाहनाच्या पुढील काचेवर चिकटवला जातो. वाहन टोल लेनमधून जाताच, सेन्सर हा टॅग वाचून वापरकर्त्याच्या लिंक केलेल्या बँक खात्यातून किंवा वॉलेटमधून टोल आपोआप कापून घेतात. नव्या प्रणालीअंतर्गत टोल प्लाझावरील मोठे बॅरियर, लांबच लांब रांगा आणि रोख पैसे देण्याची सक्ती बऱ्याच अंशी संपुष्टात येईल. ज्या वाहनांजवळ वैध ऋअरळॅ नसेल किंवा जे नियम मोडतील, त्यांना ई-नोटीस आणि दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

## डिजिटल सातबाऱ्याला मान्यता

महसूल मंत्री बावनकुळेंचा निर्णय : तलाठ्याच्या सही-स्टॅम्पची गरज संपली

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.४ :
राज्याच्या महसूल विभागात 'डिजिटल क्रांती' घडवून आणत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वसामान्यांसाठी अत्यंत दिलासादायक आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.



यापुढे डिजिटल सातबाऱ्याला कायदेशीर संरक्षण मिळणार असून, त्यासाठी तलाठ्याच्या सही किंवा शिक्क्याची गरज उरलेली नाही. या निर्णयामुळे नागरिकांना सातबाऱ्यासाठी तलाठी कार्यालयाचे उंबरे झिजवण्याची भासणार नाही.

गावागाड्यात 'जो लिहील तलाठी, तेच येईल भाळी' अशी एक म्हण प्रचलित होती. सातबारा मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना आणि नागरिकांना तलाठ्याच्या मर्जीवर अवलंबून राहावे लागत असे.

अनेकदा वेळेवर सातबारा न मिळणे किंवा त्यासाठी पैशांची मागणी होणे, यांसारख्या समस्यांना जनतेला तोंड द्यावे लागत होते. मात्र, महसूल मंत्री बावनकुळे यांच्या या एका निर्णयाने ही सर्व मनमानी संपुष्टात आणली आहे. शासनाने याविषयीचे अधिकृत परिपत्रक प्रसिद्ध केले असून, डिजिटल सातबाऱ्याला आता कायद्याचे बळ मिळाले आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या नियम १९७१ अंतर्गत हे आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यानुसार डिजिटल स्वाक्षरी, क्युआर कोड आणि १६ अंकी पडताळणी क्रमांक असलेला सातबारा आता ग्राह्य धरला जाईल. या उताऱ्यावर तलाठ्याच्या वेगळ्या सहीची किंवा स्टॅम्पची गरज नसेल. हा डिजिटल सातबारा, ८-अ आणि फेरफार उतारे सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, बँका आणि न्यायालयांमध्ये कायदेशीर पुरावा म्हणून वैध असतील.

दरम्यान, हा निर्णय शेतकरी, जमीनधारक आणि सामान्य नागरिकांसाठी सुविधा, पारदर्शकता आणि वेगवान सेवा यांचा नवा अध्याय लिहितोय. राज्यातील जनता या निर्णयाचे स्वागत करेल, याची मला खात्री आहे, असा विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

## डोनाल्ड ट्रम्प यांनी थांबवली

१९ देशांतील लोकांना नागरिकत्व प्रक्रिया



■ वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, दि. ४ :
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १९ देशांच्या नागरिकांना अमेरिकन नागरिकत्व आणि ग्रीन कार्ड देण्याची प्रक्रिया थांबवली आहे. हा निर्णय व्हाईट हाऊसजवळ नॅशनल गार्ड्सवर एका अफगाण निर्वासिताने केलेल्या गोळीबारानंतर घेण्यात आला आहे.

या देशांमध्ये अफगाणिस्तान, म्यानमार, बुरुंडी, चाड, काँगो, क्युबा, इक्वेटोरियल गिनी, एरिट्रिया, हैती, इराण, लाओस, लिबिया, सिएरा लिओन, सोमालिया, सुदान, टोगो, तुर्कमेनिस्तान, व्हेनेझुएला आणि येमेन यांचा समावेश आहे.

## मी पुतिन यांना भेटू नये अशी सरकारची इच्छा..



■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. ४ :
आज संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा चौथा दिवस आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या भारत भेटीबाबत चर्चा करण्यासाठी लोकसभेत पोहोचलेले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला.

ते म्हणाले, केंद्र सरकार मला परदेशी पाहुण्यांशी भेटू देऊ इच्छित नाही. मोदी आणि परराष्ट्र मंत्रालय हा नियम पाळत नाही. ही त्यांची असुरक्षितता आहे.

राहुल म्हणाले, आमचे सर्वांशी संबंध आहेत. विरोधी पक्षनेते एक वेगळा दृष्टिकोन देतात. आम्ही भारताचे प्रतिनिधित्व देखील करतो. सर्वसाधारणपणे, परदेशातून येणाऱ्या प्रत्येकाने विरोधी पक्षनेत्याशी भेटण्याची प्रथा आहे. पण आजकाल, केंद्र सरकार त्यांना विरोधी पक्षनेत्याशी न भेटण्याचा सल्ला देते. हे त्यांचे धोरण आहे, असेही राहुल गांधी म्हणाले.

## शिंदे गटाने काढली भाजप प्रदेशाध्यक्षांची लायकी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.४ :
कल्याण - डोंबिवली महापालिका निवडणुकीच्या तोंडावर सत्ताधारी शिवसेनेने भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची क्षमता अर्थात लायकी काढली आहे. एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी संवाद साधून भाजपशी युती केली. त्यामुळे रवींद्र चव्हाण यांची त्यावर बोलण्याची क्षमता आहे का? असे शिंदे गटाने म्हटले आहे.

भाजप - शिवसेनेत सध्या एकमेकांचे पदाधिकारी फोडण्यावरून वाद निर्माण झाला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी कल्याण ग्रामीणमधील शिंदे गटाच्या अनेक पदाधिकाऱ्यांना गळाला लावले आहे. यामुळे संतप्त झालेल्या शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखांनी थेट रवींद्र चव्हाणांना कल्याणमधून पळवून लावण्याचा इशारा दिला आहे. शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख राजेश कदम गुरूवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, भाजपसारख्या शिस्तप्रीय पक्षात रवींद्र चव्हाण यांना युतीवर बोलण्याचा अधिकार आहे का?

शिवसेना - भाजप युती नैसर्गिक विचारांवर आधारित आहे. एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी संवाद साधून युती केली आहे. हा वरिष्ठांचा विषय आहे. त्यामुळे रवींद्र चव्हाण यांची त्यावर बोलण्याची क्षमता आहे का? रवींद्र चव्हाण हे शिंदे गट व भाजपत फूट पाडण्याचे काम का करत आहेत? याचेही उत्तर हवे आहे, असे कदम म्हणाले.

## ऊर्जा क्षेत्रात पर्यावरणपूरक शाश्वत विकासाची सुरूवात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :
राज्यात सौर ऊर्जेसह नवीनीकृत ऊर्जा स्त्रोतांच्या 'डिजिटल ट्वीन' पद्धतीच्या माध्यमातून वीज वितरण व्यवस्था मजबूत करण्यात येणार आहे. महावितरणमध्ये आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहभागातून कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान (एआय) आधारित डिजिटायझेशन उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे 'एआय' तंत्रज्ञानाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ऊर्जा क्षेत्रात पर्यावरणपूरक शाश्वत आर्थिक विकासाची सुरूवात होत असल्याचा विश्वास प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

महावितरण 'द रॉकफेलर फाउंडेशन- आरएफ', 'ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट-जीईएपीपी' आणि ऊर्जा विभाग यांच्या सहकार्यातून एआय आधारित डिजिटायझेशन उपक्रम राबविणार आहे.

आरएफ आणि जीईएपीपीसारख्या संस्थांच्या सहकार्यातून अत्याधुनिक एआय आधारित जागतिक दर्जाचा प्लॅटफॉर्म हा देशातील इतर वीज कंपन्यांसाठी आदर्श ठरेल, वीज वितरण क्षेत्रातील कंपन्यासाठी



हा एक आदर्श मानदंड असेल, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

रॉकफेलरचे अध्यक्ष डॉ. शाह यांच्या प्रतिसादाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंद व्यक्त केला. महावितरण कंपनीसाठी विकसित होणाऱ्या उपाययोजना वीज वितरण क्षेत्रातील दीर्घकालीन, शाश्वत आणि परिणामकारक सहाय्यभूत असतील, असा दृढ विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला आहे.

## तीन सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :
राज्य सरकारने गुरुवारी तीन सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सदस्य सचिव पदावरून बदली झाल्यानंतर नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या अविनाश ढाकणे यांची नेमणूक मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी करण्यात आली आहे. ढाकणे यांच्यामुळे अमित सैनी यांना नव्या नियुक्तीची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

राजेश अग्रवाल यांची मुख्य सचिवपदी नियुक्ती झाल्याने रिक्त झालेल्या सामान्य प्रशासन विभागाच्या (प्रशासकीय नाविन्यता, उत्कृष्टता आणि सुशासन) प्रधान सचिवपदी अतुल पाटणे यांची नियुक्ती झाली आहे. माहिती तंत्रज्ञान विभागाचे संचालक कान्हुराज बगाटे यांची बदली मंत्रालयात नियोजन विभागाच्या सहसचिवपदी करण्यात आली आहे.

## स्टाफ कमरतेमुळे इंडिगोची ३०० उड्डाणे रद्द

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :
विमान वाहतूक क्षेत्रातील नवीन सुरक्षा नियमांमुळे, देशातील सर्वात मोठी विमान कंपनी इंडिगोला सलग तिसऱ्या दिवशीही कर्मचाऱ्यांच्या कमतरतेचा सामना करावा लागत आहे. याचा इंडिगोच्या कामकाजावर विपरीत परिणाम झाला आहे. गुरुवारी दिल्ली आणि मुंबईसह १० हून अधिक विमानतळांवर इंडिगोची ३०० हून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली.

पुणे विमानतळावरील एका प्रवाशाने आठ तासांहून अधिक वेळ वाट पाहिल्याची तक्रार केली. विमानतळाचे दोन्ही मजले प्रवाशांनी खचाखच भरलेले आहेत. तीन प्रवासी तर बेशुद्धही झाले. विमान रद्द करण्याबाबत विमान कंपनीकडून कोणताही संदेश मिळालेला नाही.

आज दिल्ली विमानतळावर इंडिगोची एकूण ९५ उड्डाणे रद्द करण्यात आली. यामध्ये ४८ निघणाऱ्या आणि ४७ येणाऱ्या देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणांचा समावेश आहे. मुंबईत ८६, बेंगळुरूमध्ये ५०, हैदराबादमध्ये ७०, जयपूरमध्ये ४ आणि इंदूरमध्ये ३ उड्डाणे रद्द करण्यात आली.

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) १ नोव्हेंबरपासून सर्व विमान कंपन्यांसाठी सुरक्षा नियमांमध्ये सुधारणा केल्या आहेत, जे वैमानिक आणि इतर क्रू सदस्यांच्या कामाचे नियमन करतात. या बदलाचा विशेषतः इंडिगो एअरलाइन्सवर परिणाम झाला आहे. गुरुवारी, इंडिगोच्या अधिकाऱ्यांनी डीजीसीएशी या विषयावर चर्चा करण्यासाठी भेट घेतली. तथापि, आज अनेक विमानतळावर प्रचंड गोंधळ उडाल्याचे चित्र होते.

## सुषमा स्वराज यांचे पती स्वराज कौशल यांचे निधन



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४ :
माजी परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांचे पती आणि भाजप खासदार बांसुरी स्वराज यांचे वडील स्वराज कौशल यांचे गुरुवारी निधन झाले. दिल्ली भाजपने त्यांच्या निधनाची माहिती दिली आहे.

मृत्यूसमयी स्वराज कौशल यांचे वय ७३ वर्ष होते. त्यांच्या पार्थिवावर आज लोधी रोड स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. स्वराज कौशल हे देशाच्या इतिहासात सर्वात कमी वयाचे राज्यपाल बनणारे व्यक्ती होते. १९९० मध्ये त्यांना मिझोरामचे राज्यपाल बनवण्यात आले होते. त्यावेळी त्यांचे वय अवघे ३७ वर्षे होते.

याशिवाय, कौशल १९९८ ते २००४ पर्यंत हरियाणातून राज्यसभा खासदारही होते. ते सर्वोच्च न्यायालयात वरिष्ठ वकील होते. या काळात त्यांनी अनेक हाय-प्रोफाइल खटले लढले.

## शेतकऱ्यांना अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेचा ऑनलाइन लाभ

राज्य सरकारची मोठी घोषणाः महाडीबीटी पोर्टलवर करता येणार अर्ज

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि.४ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारने संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तत्काळ मदत पोहोचवण्यासाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयानुसार, आता गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेचा लाभ आता शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टलद्वारे थेट ऑनलाइन मिळणार आहे. यापूर्वी हा लाभ केवळ ऑफलाइन मिळत होता. पण आता नव्या निर्णयानुसार तो ऑनलाइन मिळेल. त्याचा लाभ राज्यातील हजारो शेतकऱ्यांना मिळेल.

राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी या नव्या निर्णयाची घोषणा केली. ते म्हणाले, शेतात काम करताना विविध कारणांमुळे होणाऱ्या अपघातांमुळे अनेक शेतकऱ्यांचा मृत्यू होतो किंवा त्यांना अपंगत्व प्राप्त होते. अशा घटनांत शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी म्हणून राज्य सरकारने १९ एप्रिल २०२३ पासून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना सुरू केली होती. त्यात शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू झाल्यास २ लाख, तर १ डोळा किंवा १ अवयव कायमस्वरुपी निकामी झाल्यास १ लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाते.

आतापर्यंत या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी किंवा त्यांच्या वारसदारांना तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सविस्तर प्रस्ताव व आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागत होती. त्यात कागदपत्रांतील त्रुटी, पूर्ततेतील विलंब आदी कारणांमुळे अनुदान देण्यास विलंब होत होता. यावर उपाय म्हणून राज्य सरकारने ही संपूर्ण अर्जप्रक्रिया महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्याचा निर्णय घेतला आहे, असे कृषिमंत्री म्हणाले.

ते पुढे म्हणाले, सरकारच्या



निर्णयामुळे ऑनलाइन अर्जप्रक्रियेमुळे अपघातग्रस्त शेतकरी किंवा त्यांचे वारसदार घराबाहेर न पडता त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणावरूनच अर्ज भरू शकतील. अर्जाची सद्यस्थितीही महाडीबीटी पोर्टलवर पाहता येईल.

पोर्टलवर अर्ज भरल्यानंतर तो थेट कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या लॉगईनवर जाईल. त्यानंतर कागदपत्रांत त्रुटी आढळली तर त्याची माहिती थेट संबंधित शेतकरी किंवा वारसदारांना मोबाइलद्वारे मिळेल.

तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून प्रस्तावांची तपासणी करण्यात येईल. त्यानंतर तहसीलदारांच्या नेतृत्वातील समिती त्याला मंजुरी देईल. अखेर मंजूर अनुदानाची रक्कम थेट डीबीटीद्वारे शेतकरी किंवा वारसदारांच्या बँक खात्यात जमा होईल. या योजनेंतर्गत चालू आर्थिक वर्षासाठी १२० कोटींची तरतूद केली आहे.

आज ४३५९ शेतकरी प्रस्तावांना ८८.१९ कोटी रुपये बँक खात्यात जमा करण्यात आलेत. महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने योजना राबवल्यामुळे प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि शेतकरी केंद्रित होईल, असेही कृषिमंत्र्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# कृषिमंत्र्यांचा २४ तासांतच यू-टर्न

## २७ नोव्हेंबरला प्रस्ताव आल्याची कबुली : ४५ दिवसांनी मदत मिळणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**
अतिवृष्टी आणि पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीचा प्रस्ताव महाराष्ट्र सरकारकडून आलेलाच नाही, असे केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी २ डिसेंबर रोजी लेखी प्रश्नाच्या उत्तरात म्हटले होते. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण करताच चौहान यांनी घुमजाव केले.

२७ नोव्हेंबरलाच प्रस्ताव आला होता, अशी कबुली त्यांनी दिली. केंद्र सरकारच्या गृह आणि कृषी मंत्रालयातील विसंवादामुळे हा प्रकार घडला आहे. आता ४५ दिवसांनंतर शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होऊ शकते.

चौहान यांनी प्रस्ताव आलाच नाही, असे म्हटल्यावर विरोधकांनी राज्य सरकार शेतकरीविरोधी असल्याचा आरोप केला. त्यावर फडणवीस ३ डिसेंबर रोजी म्हणाले की, केंद्राच्या दोन पथकांनी राज्याचा दौरा केला. शेती नुकसानीचा अंतिम अहवाल केंद्राकडे गेला आहे. मात्र पायाभूत सुविधा नुकसानीची पाहणी करणारे केंद्रीय पथक येऊन गेल्यावर तो प्रस्ताव केंद्राला जाईल. राज्याचे कृषिमंत्री दत्ता भरणेंनी सांगितले की, गेल्या आठवड्यातच मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून, मदत व पुनर्वसन विभागामार्फत हा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठवला आहे. पिकांसोबत पशुधन, घरे व इतर नुकसानीची अचूक माहिती एकत्र करायची असल्याने प्रस्ताव पाठवण्यास उशिर झाला. एकूण १ कोटी ३ लाख हेक्टर पिकाचे नुकसान झाले असून, राज्याने केंद्राच्या निधीची अपेक्षा न ठेवता १९ हजार ८०१ कोटी रुपयांच्या मदतीचे २८ जीआर काढून शेतक?यांना मदत सुरू केली आहे. केंद्रीय मंत्र्यांचे विधान कदाचित अधिवेशन काळातील असल्यामुळे ही विसंगती आली असावी.

**कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत**

राज्याने २७ नोव्हेंबरला प्रस्ताव केंद्रीय गृहमंत्रालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे पाठवला. तेथून तो केंद्रीय कृषी मंत्रालयाकडे गेला नसावा. पायाभूत सुविधेचा प्रस्ताव बाकी असल्याने केंद्रीय कृषी



अधिकाऱ्यांनी प्रस्तावच येणे बाकी, असे टिपण (नोटिंग) चौहान यांना दिले आणि तेच त्यांनी सांगितले असावे. केंद्र आणि राज्यात एकच सरकार असले तरी नोकरशाहीत समन्वयाचा अभाव असू शकतो.

अहवाल केंद्राकडे गेला आहे. मात्र पायाभूत सुविधा नुकसानीची पाहणी करणारे केंद्रीय पथक येऊन गेल्यावर तो प्रस्ताव केंद्राला जाईल. राज्याचे कृषिमंत्री दत्ता भरणेंनी सांगितले की, गेल्या आठवड्यातच मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून, मदत व पुनर्वसन विभागामार्फत हा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठवला आहे. पिकांसोबत पशुधन, घरे व इतर नुकसानीची अचूक माहिती एकत्र करायची असल्याने प्रस्ताव पाठवण्यास उशिर झाला.

एकूण १ कोटी ३ लाख हेक्टर पिकाचे नुकसान झाले असून, राज्याने केंद्राच्या निधीची अपेक्षा न ठेवता १९ हजार ८०१ कोटी रुपयांच्या मदतीचे २८ जीआर काढून शेतक?यांना मदत सुरू केली आहे. केंद्रीय मंत्र्यांचे विधान कदाचित अधिवेशन काळातील असल्यामुळे ही विसंगती आली असावी.

**केंद्राकडे पायाभूत सुविधांबाबत प्रस्ताव गेल्यावर रक्कम मिळेल**

नुकसानीची पाहणी झाल्यानंतर पुढील प्रक्रिया राबवली जाते. यामध्ये पायाभूत सुविधांच्या नुकसानीची पाहणी केंद्राच्या पथकाने केल्यावर कृषी आणि पायाभूतसाठी मदत असा एकत्रित प्रस्ताव तयार होईल. सुमारे ४१७६ कोटी रुपयांच्या या प्रस्तावाला केंद्र सरकार राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (एनडीआरएफ) अंतर्गत रक्कम मंजूर करेल. या प्रक्रियेला किमान ४५ दिवस लागू शकतात.

## विरोधकांच्या प्रश्नांना उत्तर देण्याचे सत्ताधारी पक्षाकडे धाडस नाही



■ **मुंबई :** सत्ताधारी पक्षाकडे पाशवी बहुमत आहे.परंतू विरोधकांच्या प्रश्नांना सामोरे जाण्याचे त्यांच्यामध्ये नैतिक धाडस नाही. सर्वच क्षेत्रातील घटकांना त्यांनी घोषणांनी फसवलेले असल्याने विरोधकांच्या प्रश्नांना उत्तर देण्याचे धाडस त्यांच्यामध्ये नाही, म्हणून अधिवेशन वाढवण्यासाठी ते तयार नाही, असे उबाठाचे नेते भास्कर जाधव यांनी म्हटले आहे. घटनेमधील नियमामध्ये,कायद्यामध्ये विरोधी पक्षनेता असलाच पाहिजे, हे संवैधानिक पद आहे. त्याला कायद्यामध्ये आधार आहे. उपमुख्यमंत्रीपद हे संवैधानिक नाही. हे राजकीय सोय आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची घटना आणि विधीमंडळाचे नियम असेल यामध्ये विरोधी पक्षनेता असलाच पाहिजे ही तरतूद आहे. यामुळे येत्या अधिवेशात दोन्ही सभागृहाचे विरोधी पक्षनेतेपद जाहीर करावे अशी मागणी जाधवांनी केली आहे.

भास्कर जाधव म्हणाले की, सरकार सभागृहाच्या बाहेर बोलताना विरोधी पक्षनेतेपदावर बोलताना फार गंभीरपणे बोलते पण हा कार्यक्रम विधीमंडळात येईल ही अपेक्षा ठेवण्यापलीकडे आपल्याकडे काही नाही. निवडणूक आयोग ही स्वायत्त संस्था आहे की कुठल्या पक्षाच्या कार्यालयात बसून काही निर्णय होतात असे सर्वसामान्य माणसाला वाटवे अशी परिस्थिती सध्या तयार झालेली आहे. लोकशाहीची आणि निवडणुकाची थट्टा सत्ताधारी पक्ष आणि नामधारी स्वायत्त संस्था करत आहेत.

## हलालवरून नवा राजकीय वाद

■ **मुंबई :** भाजप नेत्या आणि राज्यसभेच्या खासदार मेधा कुलकर्णी यांनी संसदेच्या सभागृहात हलाल प्रमाणपत्राचा मुद्दा झिरो अवरमध्ये उचलून धरला. यामुळे नवा राजकीय वाद पेटण्याची चिन्हं स्पष्ट दिसू लागली आहेत.
कुलकर्णी म्हणाल्या की, हलाल ही संकल्पना एका विशिष्ट धर्मापुरती मर्यादित असून मुख्यत्वे मांसाहारी खाद्यपदार्थांशी संबंधित आहे. पण आज स्थिती अशी आहे की दूध, साखर, तेल, औषधे, अगदी सिमेंट, स्टीलसारख्या अखाद्य वस्तूंनाही हलाल सर्टिफिकेशन दिलं जातं आणि या प्रक्रियेत तांत्रिक, प्रशासकीय अनियमितता वाढत आहे. त्यांनी प्रश्न केला, आपला देश धर्मनिरपेक्ष असताना हिंदू-शीख समाजावर हलाल मांसाची सक्ती करणं योग्य आहे का? हा धार्मिक स्वातंत्र्यावर आघात नाही का?
आरोग्य विषयक काही अहवालांमध्ये हलाल पद्धतीने तयार झालेलं मांस आरोग्यास धोकादायक असल्याचे दावेही त्यांनी सभागृहात मांडले. देशभरात ७०-८० बोगस, अवैध संस्था हलाल प्रमाणपत्र वाटत आहेत. यूपीमध्ये अशा काही संस्थांवर गुन्हे नोंदवले गेल्याचा उल्लेखही त्यांनी केला. देशात आधीच एफएसएसएआय आणि एफडीआय ही अधिकृत प्रमाणन यंत्रणा अस्तित्वात असताना, खासगी आणि धार्मिक संस्थांकडे खाद्य प्रमाणनाचा अधिकार का आणि कसा दिला जातो, असा सवाल त्यांनी केला.

# 'कुंभ' साठी वृक्षतोडीवरून खडाजंगी!

### वृक्षतोडीची चिंता करणारे पर्यावरणवादी ईदला बकरी कापण्यास विरोध का करत नाहीत?

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ४ :**
भाजपचे मंत्री नीतेश राणे यांनी नाशिकच्या तपोवनातील वृक्षतोडीचे समर्थन करत पर्यावरणवाद्यांवर तिखट हल्ला चढवला आहे.



नीतेश राणे यांचे वादग्रस्त विधान

तपोवनातील वृक्षतोडीची चिंता करणारे पर्यावरणवादी ईदच्या वेली बकरी कापण्याला विरोध करताना कधीच दिसत नाहीत, असे ते म्हणालेत.
तपोवनातील वृक्षतोडीची चिंता करणारे पर्यावरणवादी कधीच ईदच्या वेळी बकरी कापण्याला विरोध करताना दिसत नाहीत. तेव्हा ते गप्प का? सर्व धर्म समभाव?, असे नीतेश राणे गुरूवारी एका पोस्टमध्ये म्हणाले.
तपोवनातील वृक्षतोडीच्या मुद्यावरून राजकारण तापले असताना नीतेश राणे यांनी हे विधान केल्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे.

### तपोवनातील झाडे तोडलेले साधू संतांना तरी चालेल का?

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ४ :**
पर्यावरण प्रेमी अभिनेते सयाजी शिंदे यांनी नाशिकच्या तपोवनातील वृक्षतोडीविरोधात अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी गुरूवारी पुन्हा एकदा आपली भूमिका स्पष्ट केली. त्यात त्यांनी साधूसंतांना तरी तपोवनातील झाडे तोडणे चालेल का? असा खडा सवाल केला आहे.



सयाजी शिंदेंनी सुनावले खडेबोल

सयाजी शिंदे यांनी आज पुन्हा नाशिक येथील वृक्षतोडीवर आपली भूमिका स्पष्ट केली. तसेच वृक्षतोड साधूसंतांनाही चालणार नाही असे ठणकावून सांगितले. ते म्हणाले, १० वर्षांच्या आतील झाडे तोडण्याची व त्या बदल्यात दुसरी झाडे लावण्याची कल्पनाच मुळात चुकीची आहे. म्हणजे पोरांना मारायचे आणि आई-बापाला जिवंत ठेवायचे. प्रत्यक्षात त्यांचे उरलेले वय किती आहे? हे बघायचेच नाही.

वृक्ष हे आपले आई-वडील आहेत. आपल्या आई-वडिलांवर कुणी हल्ला केला तर आपण गप्प बसणार का? असा माझा सवाल असल्याचे ते म्हणाले.

## पार्थ पवारांवर एफआयआर झाला की दादांचा राजीनामा नक्की

■ **वृत्तसंस्था पुणे, दि. ४ :**
मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया पुन्हा एकदा आक्रमक झाल्या आहेत.



दमानियांचा दावा

या घोटाळ्याचा प्राथमिक तपास अहवाल तात्काळ समोर आला पाहिजे, अशी मागणी करत त्यांनी थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांना लक्ष्य केले आहे.

एफआयआरमध्ये अमेडिया कंपनी आणि पार्थ पवार यांचे नाव समाविष्ट झालेच पाहिजे. एकदा का पार्थ यांचे नाव गुन्ह्यात आले की अजित पवार यांना राजीनामा द्यावाच लागेल आणि त्यासाठीच माझा लढा सुरू आहे, असा इशारा अंजली दमानिया यांनी दिला आहे.

दमानिया म्हणाल्या, सामान्य नागरिकांना वेगळा कायदा आणि राजकारण्यांसाठी कायदा वेगळा झाला आहे, हीच महाराष्ट्राची आजची स्थिती आहे. शीतल तेजवानीला पुण्यातील महार वतनाच्या जमीन हडप करण्याच्या प्रकरणात झालेली अटक फक्त दिखावा असून पार्थ पवारचे नाव सुद्धा एफआयआरमध्ये नाही. सरकारी जमीन १८०० कोटींची खाऊनही त्याला अटक होत नाही.

पार्थ पवार यांच्या एफ आयआर साठी विरोधी पक्षांनीही आक्रमक मागणी करणे गरजेचे होते. काँग्रेस हा मुद्दा अधिवेशनात उपस्थित करणार असल्याचे समजते, मात्र इतर विरोधी पक्ष काय करत आहेत? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

**गिरीश महाजनांचे नाशिकमध्ये षडयंत्र?**

नाशिकच्या तपोवनमध्ये साधूग्रामच्या नावाखाली ती जमीन बळकावून तिथे मुंढव्यासारखे षडयंत्र केले जातंय, असे मला कळतंय. हे षडयंत्र गिरीश महाजन करत आहेत. त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पूर्ण समर्थन देत आहेत.

नाशिकची जनता तपोवनासाठी, तिथल्या झाडांसाठी लढत आहेत. छोटी छोटी मुले झाडांना पकडून उभी आहेत. तरी सुद्धा या लोकांना पैशाची हाव सुटली आहे. परंतु, नाशिककर हे खपवून घेणार नाहीत. महाराष्ट्रातील सगळ्या जनतेने नाशिककरांच्या पाठिशी ताकदीने उभे राहायला पाहिजे.

हा केवळ नाशिकचा विषय नाही, तर सगळीकडे अशीच झाडे तोडली जात आहेत. जमिनी भूईसपाट करून बिल्डर आणि राजकारण्यांच्या घशात जात आहेत, असा आरोप त्यांनी केला.

## राज्यातील जनतेस उपलब्ध होणार सर्वसमावेशक कर्करोग सेवा

### शिखर संस्था म्हणून टाटा स्मारक रूग्णालय काम पाहणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**
कर्करोगाचे वाढते प्रमाण व कर्करोग उपचाराचे गांभीर्य विचारात घेता राज्यातील जनतेस सर्वसमावेशक कर्करोग सेवा राज्य शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाने दिलेल्या सूचनेनुसार 'आसाम कॅन्सर केअर मॉडेलच्या' धर्तीवर राज्यात त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा एल १,एल २,एल ३ उपलब्ध होणार आहेत. एल १ या स्तरामध्ये टाटा स्मारक रूग्णालय ही कर्करोगाकरिता शिखर संस्था म्हणून काम करणार आहे. एल २, एल ३ या स्तरावर असणाऱ्या या रूग्णालयात कर्करोगासंबधित प्रशिक्षण मनुष्यबळ निर्माण करणे तसेच या आजाराविषयी संशोधन कार्यात प्रगती करण्यात येणार आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाने याबाबत धोरण निश्चीत केले आहे.जिल्हास्तरावर सुरू होणाऱ्या उपचारामुळे अनेक कर्करोगग्रस्त रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांचा वेळ वाचणार आहे आणि स्थानिक जिल्ह्यातच आरोग्य सुविधा उपलब्ध होणार असल्याने या रूग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

राज्यात त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा उपलब्ध होणार आहेत. एल १ मध्ये टाटा स्मारक रूग्णालय ही कर्करोगाकरिता शिखर संस्था म्हणून काम करणार आहे. एल २ या स्तरावरती कायमस्वरूपी संपूर्ण कर्करोग शिक्षण व सेवा असेल यामध्ये छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, नागपूर, मुंबई (जे.जे.), कोल्हापूर, पुणे (बैरामजी जिजीभॉय शासकीय महाविद्यालय), नांदेड येथील सात शासकीय महाविद्यालयांशी संलग्नित रूग्णालये, नाशिक व अमरावती येथील आरोग्य विभागाच्या अखत्यारितील दोन संदर्भ सेवा रूग्णालयांचा यामध्ये समावेश आहे. अशी नऊ केंद्रे एल २ मध्ये समाविष्ट आहेत.

एल ३ यास्तरामध्ये मध्ये कर्करोग निदान आणि डे-केअर रेडिओथेरिपी व किमोथेरिपी युनिटस यामध्ये कार्यरत असणार आहेत. अंबाजोगाई (बीड), यवतमाळ, मुंबई(कामा व आल्ब्लेस रूग्णालय), सातारा, बारामती, जळगाव व रत्नागिरी येथील शासकीय महाविद्यालयांशी संलग्नित सात रूग्णालये, ठाणे जिल्हा रूग्णालय संलग्नित व शिर्डी संस्थानचे रूग्णालय अशी एकूण नऊ केंद्रे एल ३ म्हणून कार्यरत होतील. एल २ स्तरामध्ये व एल ३ स्तरामध्ये एकूण १८ रूग्णालये कार्यरत असतील. एल ३ स्तरावरील कर्करोग रूग्णालयांचे बांधकाम शासनामार्फत होवून ही रूग्णालये सार्वजनिक खासगी भागीदारी तत्वावर उभारण्यात येतील मात्र या रूग्णालयावर शासनाचे सर्व नियंत्रण असेल.

एल २ व एल ३ स्तरावरील आरोग्य संस्थांना आवश्यकतेनुत्तार मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे, संस्थांचे व्यवस्थापन करणे, पीपीपी धोरण राबविणे तसेच इतर अनुषंगिक बाबी पार पाडणे इ. बाबींकरिता मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कंपनी कायदा, २०१३ मधील सेक्शन-८ अंतर्गत महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फांउडेशन महाकेअर फांउडेशन ही कंपनी स्थापन करण्यात येणार आहे.

## वादग्रस्त विधानावरून काँग्रेसची नीतेश राणेंवर टीका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**
काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी या प्रकरणी नीतेश राणेंवर निशाणा साधला आहे. प्रत्येक गोष्टीत आपण काय करतो, काय करत नाही, पुढची पिढी आपल्याला काय म्हणाले? याचा विचार न करता मंत्रिपदावर बसून असे बेजबाबदार विधान करणे शोभते का? आपले मंत्रिपद व राजकारण टिकवण्यासाठीच नीलेश राणे असे बोलतात. तपोवनातील वृक्षतोडीचे कुणी समर्थन करत असेल तर त्याचा अर्थ त्याला आपल्या पुढच्या पिढीची काळजी नाही. त्याला फक्त धर्माच्या नावावर राजकारण करायचे आहे.

नाशिकमध्ये यापूर्वी कुंभमेळा झाला नाही का? शेकडो वर्षांपासून तिथे कुंभमेळा होत आहे. तेव्हा झाडे तोडण्याची गरज पडली नाही. मग आत्ताच का झाडे तोडली जात आहेत? असा सवालही अतुल लोंढे यांनी उपस्थित केला आहे.

दुसरीकडे, दिंडोरीचे खासदार भास्कर भगरे यांनी तपोवनातील वृक्षतोडीविरोधात केंद्रीय पर्यावरण व वनमंत्री भूपेंद्र यादव यांना निवेदन दिले आहे. त्याद्वारे त्यांनी तपोवनातील वृक्षतोडीला स्थगिती देण्याची विनंती केली आहे.

तत्पूर्वी, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही वृक्षतोडीला विरोध करत या प्रकरणी सरकारला सामोपचाराने मार्ग काढण्याचे आवाहन केले होते. तपोवनातील वृक्षतोडीच्या संदर्भात समोपचारानं तोडगा काढला पाहिजे. यासंदर्भात अभिनेते सयाजी शिंदे यांनी घेतलेली भूमिका पर्यावरण हिताची आहे.

## ९ वर्षाच्या मुलीवर लिफ्टमध्ये अत्याचार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**
बोरिवली पूर्व भागात एका ६५ वर्षीय निवृत्त पोलिस अधिकाऱ्याने शेजारी राहणाऱ्या ९ वर्षांच्या चिमुरडीवर लिफ्टमध्ये लैंगिक अत्याचार केल्याचा संतापजनक प्रकार घडला आहे.

बोरिवली पूर्व परिसरातील एका गृहनिर्माण संस्थेत ही घटना संध्याकाळी सातच्या सुमारास घडली. पीडित ९ वर्षीय मुलगी आपल्या घरी जाण्यासाठी लिफ्टमध्ये शिरली. यावेळी त्याच इमारतीत राहणाऱ्या निवृत्त पोलिस अधिकाऱ्याने तिला लिफ्टमध्ये एकटे गाठले. लिफ्टमध्येच या नराधमाने मुलीला ओढत तिच्यावर बळजबरीने लैंगिक अत्याचार केला. हे संपूर्ण दुष्कृत्य लिफ्टमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहे.

**सेवानिवृत्त पोलिस अधिकाऱ्याने केले कृत्य**

घडलेल्या प्रकारामुळे घाबरलेल्या मुलीने घरी पोहोचताच आपल्या आईला या घटनेची माहिती दिली. आईने या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तात्काळ कस्तुरबा मार्ग पोलिस ठाणे गाठले आणि तक्रार दाखल केली.

कस्तुरबा मार्ग पोलिसांनी आरोपी निवृत्त पोलिस अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आणि त्याला अटक केली. आरोपीला बोरिवली न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला १२ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. कस्तुरबा मार्ग पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे.

## भारताचा जागतिक वस्त्रोद्योग मेगा कार्यक्रम भारत टेक्स २०२६ ची घोषणा



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**
भारत टेक्स ट्रेड फेडरेशन १४ ते १७ जुलै २०२६ दरम्यान नवी दिल्लीतील प्रतिष्ठित भारत मंडपम येथे भारत टेक्स देशातील प्रमुख जागतिक वस्त्रोद्योग आणि वस्त्रोद्योग कार्यक्रमाच्या तिसऱ्या आवृत्तीचे आयोजन करण्यासाठी सज्ज होत आहे.
भारत टेक्स ट्रेड फेडरेशन आघाडीच्या निर्यात प्रोत्साहन परिषद आणि उद्योग संघटनांचे एक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पत्रकार परिषदेत ही घोषणा करण्यात आली. नेतृत्वाने आगामी आवृत्तीचे दृष्टिकोन, स्केल आणि प्रमुख ठळक मुद्दे सामायिक केले, ज्यामुळे भारत टेक्स २०२६ च्या तयारीची औपचारिक सुरुवात झाली.

भारत टेक्सच्या पहिल्या २ आवृत्त्यांनी आधीच भारताच्या जागतिक मेगा वस्त्रोद्योग कार्यक्रम म्हणून आपले स्थान मजबूत केले आहे. १४ ते १७ फेब्रुवारी २०२५ रोजी भारत मंडपम आणि इंडिया एक्स्पो सेंटर अँड मार्ट, ग्रेटर नोएडा येथे झालेल्या भारत टेक्सच्या दुसऱ्या आवृत्तीला प्रचंड यश मिळाले.

२.२ मिलियन चौरस फूट क्षेत्रात पसरलेल्या या कार्यक्रमात ५,००० हून अधिक प्रदर्शक, १२०+ देशांतील ६,००० आंतरराष्ट्रीय खरेदीदार सहभागी झाले होते आणि १,२०,००० हून अधिक अभ्यागतांना आकर्षित केले होते. ८०+ ज्ञान सत्रे, ८,०००+ बी२बी/बी२जी बैठका आणि उच्च-स्तरीय धोरण संवादांसह, या आवृत्तीने अंदाजे २.५ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या निर्यात संधी आणि २,१०० कोटींहून अधिक गुंतवणूक वचनबद्धता निर्माण केल्या.

बीटीटीएफचे अध्यक्ष नरेन गोएंका यांनी भारत टेक्स २०२४ आणि २०२५ च्या उल्लेखनीय यशासह, आगामी २०२६ आवृत्ती भारताच्या कापड मूल्य साखळीसाठी एकत्रित प्रदर्शन म्हणून व्यासपीठाला नवीन उंचीवर घेऊन जाण्यास सज्ज असल्याचे सांगितले. २०२६ ची आवृत्ती पंतप्रधानांच्या परिवर्तनकारी ५एफ व्हिजन फार्म टू फायबर, फायबर टू फॅक्टरी, फॅक्टरी टू फॅशन आणि फॅशन टू फॉरेनचे प्रतिबिंबित करत राहील. ज्यामुळे कापड मूल्य साखळीतील प्रत्येक दुवा एका छताखाली एकत्र येईल.

अशा प्रकारच्या सर्वात मोठ्या संमेलनांपैकी एक म्हणून सज्ज असलेले भारत टेक्स २०२६ जगातील आघाडीचे कापड उत्पादक, खरेदीदार आणि उद्योगातील दूरदर्शींना एकाच छताखाली एकत्र करेल.
बीटीटीएफचे सह-अध्यक्ष भद्रेश दोधिया म्हणाले की, ग्लोबल टेक्सटाईल डायलॉग २०२६ असेल, ज्यामध्ये जागतिक उद्योग नेते, सीएक्सओ, धोरणकर्ते आणि शाश्वतता तज्ञ एकत्र येऊन इंडस्ट्री ४.०, ईएसजी आवश्यकता, संशोधन आणि विकास सहयोग आणि उदयोन्मुख व्यापार गतिमानतेवर चर्चा करतील.

भारत टेक्स २०२६ एक शाश्वत आणि विश्वासार्ह जागतिक सोर्सिंग हब म्हणून भारताचे स्थान आणखी मजबूत करेल, ज्यामुळे एमएसएमई, स्टार्ट-अप आणि कारागिरांना जागतिक बाजारपेठा, गुंतवणूकदार आणि तंत्रज्ञान भागीदारांशी संवाद साधण्यासाठी नवीन संधी मिळतील. टेक्सटाईल इनोव्हेशनमधील भारताच्या नेतृत्वावर हा कार्यक्रम अधिक प्रकाश टाकेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## मुंबईत ५ ते ७ डिसेंबरदरम्यान अरबी समुद्राला मोठी भरती

### ५ मीटरच्या लाटा उसळण्याची शक्यता : प्रशासनाचे नागरिकांना आवाहन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादरच्या चैत्यभूमीवर लाखोंच्या संख्येने अनुयायी येत असतानाच, मुंबई महापालिकेने समुद्रातील मोठ्या भरतीचा इशारा दिला आहे.

येत्या ५ ते ७ डिसेंबर २०२५ या कालावधीत अरबी समुद्रात साडेचार ते पाच मीटर उंचीच्या लाटा उसळणार आहेत. त्यामुळे चैत्यभूमी आणि शिवाजी पार्क परिसरात येणाऱ्या अनुयायांनी समुद्रकिनाऱ्यावर जाताना विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ६ डिसेंबर रोजी म्हणजेच महापरिनिर्वाण दिनी समुद्राला मोठी भरती असणार आहे. ६ डिसेंबरच्या मध्यरात्री १२ वाजून ३९ मिनिटांनी समुद्रात तब्बल ५.०३ मीटर उंचीच्या लाटा उसळतील.



महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर चौपाटीवर अनुयायांची मोठी गर्दी असते. अनेकजण अभिवादनानंतर समुद्रकिनाऱ्यावर जातात. मात्र, या काळात समुद्राचे रूप रौद्र असल्याने नागरिकांनी पाण्याच्या जवळ जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

**सूचनांचे पालन करण्याचे आवाहन**

पुढील तीन दिवस समुद्रात मोठ्या लाटा उसळणार असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव महापालिका आणि मुंबई पोलीस सतर्क झाले आहेत. नागरिकांनी आणि अनुयायांनी समुद्रात खोलवर जाऊ नये, तसेच किनाऱ्यावर तैनात असलेले पोलीस आणि जीवरक्षक यांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे निर्देश महापालिका प्रशासनाने दिले आहेत. दरम्यान, किनाऱ्यांवर सुरक्षा दल तैनात करण्यात येत आहे.

# लाचखोर सरपंच पती, ग्रामसेवक व विस्तार अधिकारी अटकेत

## एसीबी अमरावतीची मोठी कारवाई ◆ चौघांवर गुन्हा दाखल

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 4)** ग्रामपंचायत कवठा बहाळे येथे ग्रामरोजगार सेवक म्हणून केलेल्या कामाचे 1 लाख 62 हजार 500 रुपये मानधनाचा चेक सरपंचांच्या सहीसाठी तब्बल 50 हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. तडजोडीनंतर ही रक्कम 40 हजार रुपये करण्यात आली होती. तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीनंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करत चार आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे.

गुन्हा दाखल झालेल्या आरोपीमध्ये सरपंचपती शशीकांत मनोहरराव मेश्राम (वय 35, रा. कवठा बहाळे), ग्रामसेवक सुरेंद्र कुरवाडे (वय 40, रा. नायरा पेट्रोल पंपाजवळ, अमरावती), भातकुली पंचायत समितीचे विस्तार अधिकारी प्रल्हाद नामदेवराव तेलंग (वय 53, रा. जिजाऊ कॉलनी, अर्जुननगर) व कंत्राटदार चंदन बाबाराव नागमोते (वय 38, रा. पार्वतीनगर, अमरावती) यांचा समावेश आहे. माहितीनुसार, 27 ऑक्टोबर व 19 नोव्हेंबर रोजी एसीबीने पंचांसमक्ष पडताळणी केली. त्यावेळी सरपंच-पती शशीकांत मेश्राम यांनी चेकवर सही मिळवण्यासाठी 40 हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. ग्रामसेवक सुरेंद्र कुरवाडे यांनी सरपंचासाठी अतिरिक्त 30 हजार रुपये मागत लाच स्वीकारण्याची तयारी दाखविली. तर विस्तार अधिकारी प्रल्हाद तेलंग व कंत्राटदार चंदन नागमोते यांनी तक्रारदाराला लाच देण्यास प्रवृत्त केले. एसीबीने 19 नोव्हेंबर रोजी लाच स्वीकारण्यासाठी सापळा रचला. मात्र तक्रारदाराबद्दल संशय आल्याने सरपंच-पती आणि ग्रामसेवक यांनी पैसे स्वीकारले नाहीत.



तरीही लाच मागणीचे ठोस पुरावे असल्याने चौघांनाही बुधवारी (दि.3) ताब्यात घेण्यात आले आणि खोलापुरी गेट पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक बापू बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक सचिन्द्र शिंदे, उपअधीक्षक सुनिल किनगे, सापळा अधिकारी पो.नि. योगीता ठाकरे व त्यांच्या पथकाने केली.

# कुख्यात गुन्हेगार फिरोज काझी उर्फ 'बाली' स्थानबद्ध

- अमरावती पोलिसांची मोठी कारवाई
- एम.पी.डी.ए.अंतर्गत थेट मध्यवर्ती कारागृहात रवानगी
- शहरातील गुन्हेगारांवर आणखी कडक कारवाईची तयारी

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 4)** शहरातील कुख्यात, धोकादायक आणि सतत गुन्हेगारीत सक्रिय असलेला फिरोज काझी उर्फ बाली जहीरोद्दिन काझी (वय 33, रा. इकबाल कॉलनी) याला अमरावती पोलिसांनी एम.पी.डी.ए. अंतर्गत स्थानबद्ध करून थेट मध्यवर्ती कारागृहात दाखल केले आहे.

फिरोज काझी हा सन 2021 पासून अमरावतीत गुन्हेगारीच्या क्षेत्रात अत्यंत सक्रिय आहे. त्याच्यावर पो. स्टे. नागपुरी गेट येथे एकूण 8 गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. दुखापत व बलप्रयोग, प्राणघातक धमकी, अश्लील कृत्य, एकत्र येऊन गुन्हा करणे, शांतता भंग व फौजदारी धाकदपट, खंडणी, अंमली पदार्थांचा साठा, अवैध शस्त्र बाळगणे व विक्री, हद्दपार आदेशाचे उल्लंघन, यापूर्वीही त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई व तडीपारी करण्यात आली होती, तरीही तो गुन्हेगारीत सक्रियच राहिला. फिरोजविरुद्धची प्रस्तावित कार्यवाही पोलीस निरीक्षक हनमंत उरलागोंडावार व पोलिस निरीक्षक जनार्दन साळुंखे यांनी तयार केली. गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे, पोलिस निरीक्षक सीमा दाताळकर, संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली एम.पी.डी.ए. सेलने हा प्रस्ताव पूर्ण केला. कार्यवाहीदरम्यान सहायक पोलिस निरीक्षक इम्रान नायकवडे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक अजय मिश्रा, चेतन कराडे, तसेच नागपुरी गेट पोलीस स्टेशनचे पोलिस हवालदार आनंद ठाकुर, मंगेश बोरकर यांनी सक्रिय सहभाग घेतला. 3 डिसेंबर रोजी पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांनी फिरोज काझीला स्थानबद्धतेचा आदेश जारी केला. आदेशाची तामिली करून त्याला त्याच दिवशी मध्यवर्ती कारागृह, अमरावती येथे दाखल करण्यात आले.

**शहरातील गुन्हेगारांवर पोलिसांची कडक नजर**

आगामी सण-उत्सव, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर, शहर पोलिस आयुक्तालयाने सराईत गुन्हेगारांची यादी तयार केली आहे. त्यांच्यावर एम.पी.डी.ए., तडीपार, प्रतिबंधक कार्यवाही यांसह कठोर उपाययोजना करण्याची तयारी सुरू आहे.



# ग्रामीण भागात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**अमरावती**- जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम 1951 चे कलम 37 (1) व (3) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून जिल्ह्यातील ग्रामीण भागात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश दि. 14 डिसेंबर 2025 च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे जिल्हादंडाधिकारी आशिष येरेकर यांनी कळविले आहे.

# पर्यटनस्थळी नेऊन अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

## तिवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 4)** - अमरावती येथे शिकणाऱ्या एका अल्पवयीन मुलीला तिवासा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका पर्यटनस्थळी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आला. अल्पवयीन मुलीच्या तक्रारीवरून तिवसा पोलिसांनी आरोपी तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

माहितीनुसार, तक्रारदार, 17 वर्षीय मुलगी, गेल्या वर्षभरापासून अमरावती येथे शिक्षण घेत आहे. 26 नोव्हेंबर रोजी ती एका मैत्रिणीला भेटण्यासाठी तिवसा बस स्टँडवर गेली होती. तिथून आरोपी तरुण तिला मोटारसायकलवरून 15 किलोमीटर अंतरावर असलेल्या एका पर्यटनस्थळी घेऊन गेला, जिथे त्याने तिच्याशी लैंगिक संबंध ठेवले. त्यानंतर त्याने तिला तिवसा बस स्टँडवर सोडले. त्यानंतर पीडित मुलगी अमरावती येथील तिच्या खोलीत परतली. तथापि, तिला अस्वस्थ वाटल्याने तिच्या मैत्रिणीने तिला एका खाजगी रुग्णालयात नेले, तेथून तिला पीडीएमसी रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि गाडगेनगर पोलिसांना कळवले. अल्पवयीन मुलीच्या तक्रारीवरून, गाडगेनगर पोलिसांनी आरोपी तरुणाविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला. ही घटना तिवसा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली असल्याने, तिवसा पोलिसांना या प्रकरणाची तक्रार करण्यात आली. तिवसा पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत.



# महापालिकेच्या आरक्षणाचा अंतिम आराखडा जाहीर

## प्रभागनिहाय आरक्षण निश्चित; राज्य निवडणूक आयोगाची मान्यता

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 4)** आगामी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेच्या प्रभागनिहाय आरक्षणाचा अंतिम आराखडा गुरुवारी जाहीर करण्यात आला. नगर विकास विभाग, राज्य निवडणूक आयोग आणि महानगरपालिका प्रशासन यांच्या मान्यतेनंतर महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी ही अधिसूचना प्रसिध्द केली. नागरिकांकडून प्राप्त हरकतीसूचनांचा सखोल अभ्यास करून मंजूर आरक्षणाची अंतिम यादी तयार करण्यात आली आहे.

महापालिकेच्या 22 प्रभागांतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग तसेच सर्वसाधारण प्रवर्गानुसार आरक्षणाचे प्रमाण निश्चित करण्यात आले आहे. विशेषत: महिलांसाठी मोठ्या प्रमाणात जागा राखीव ठेवण्यात आल्या असून सर्व प्रवर्गांमध्ये साधारण 50 टक्क्यांपर्यंत प्रतिनिधित्व दिले गेले आहे. सामाजिक समतोल साधण्याचा हा प्रयत्न सकारात्मक पाऊल म्हणून पाहिला जात आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार 12 नोव्हेंबर 2025 रोजी आरक्षणाची प्रारंभिक सोडत काढण्यात आली होती. त्यानंतर 17 ते 24 नोव्हेंबरदरम्यान हरकतीसूचना मागविण्यात आल्या. प्राप्त सर्व हरकतींचा विचार करून अंतिम आरक्षण अधिसूचना जारी करण्यात आली. यात अनुसूचित जमातींसाठी 2 जागा राखीव असून त्यापैकी 1 जागा महिलांसाठी आहे. मागासवर्गीय प्रवर्गाला सर्वाधिक 23 जागा देण्यात आल्या असून त्यापैकी 12 जागा महिला राखीव आहेत. अनुसूचित जाती प्रवर्गात 15 जागांपैकी 8 जागा महिलांसाठी ठेवण्यात आल्या आहेत, तर सर्वसाधारण प्रवर्गातील 47 जागांपैकी 23 जागा महिलांसाठी राखीव आहेत.

अंतिम आरक्षण जाहीर झाल्यानंतर आता निवडणुकीतील चतुःसूत्री राजकीय समीकरणे बदलण्याची अपेक्षा आहे. महिलांसाठी वाढलेला कोटा, मागासवर्गीय प्रभागांचे प्रमाण आणि अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या स्थानामुळे पक्षांच्या उमेदवारीची गणिते नव्याने आखली जातील, अशी राजकीय वर्तुळातील चर्चा आहे.

# विवाहितेच्या आत्महत्या प्रकरणात पतीविरुध्द गुन्हा

## वडिलांनी दिली पोलिसांत तक्रार

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 4)** खल्लार पोलीस ठाणे हद्दीतील बोराळा येथे पतीच्या छळाला कंटाळून एका विवाहितेने तलावात आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी मृत महिलचे वडील राजेश उत्तमराव निंबाळकर (वय 52) यांच्या तक्रारीनुसार पोलिसांनी पती सचिन उर्फ प्रशांत शिवलाल श्रीवास (वय 30, रा. अजीतपूर, दर्यापूर) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, मुलीचा सन 2022 मध्ये सचिन श्रीवास याच्याशी प्रेमविवाह झाला होता. मात्र, लग्नाला वर्षही पूर्ण होण्याआधीच पतीने तिला माहेरी आणून सोडचिठ्ठी दिली होती. त्यानंतरही सचिन सतत पत्नीला मानसिक त्रास देत होता. 30 नोव्हेंबर रोजी सचिनने पत्नीला धमकी देत म्हटले की, तुला अडकवून टाकीन, तू अजून जिवंत कशी? तू मरत का नाहीस? या धमकीमुळे ती अत्यंत घाबरून गेली होती. मानसिक तणाव आणि भीतीतूनच संबंधित विवाहितेने बोराळा तलावात आत्महत्या केली. राजेश निंबाळकर यांनी खल्लार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, त्यावरून पोलिसांनी पती सचिन श्रीवासविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# दर्यापूर तहसीलमधून आणखी एक जप्त ट्रॅक्टर लंपास

## सुरक्षा व्यवस्थेला तडा; महसूल प्रशासनावर पुन्हा संशयाचे सावट

महासागर | प्रतिनिधी

**दर्यापूर (दि. 4)** - तालुक्यातील अवैध रेतीवाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जप्त करण्यात आलेले ट्रॅक्टरच तहसील कार्यालयातून लंपास झाल्याने महसूल प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. 3 डिसेंबरच्या मध्यरात्रीनंतर अज्ञात चोरट्याने नव्या शासकीय इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराची तोडफोड करून स्वराज कंपनीचा विनानंबर ट्रॅक्टर पळवून नेल्याची घटना घडली.

**तिसरी चोरी - सुरक्षा व्यवस्थेचा बोजवारा**

दर्यापूर तहसीलच्या नव्या इमारतीत गेल्या पाच महिन्यांपासून अवैध रेती तस्करीतून जप्त केलेल्या वाहनांच्या चोरीच्या घटना सातत्याने घडत आहेत. ही पाच महिन्यातील तिसरी घटना असल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणावर बोट ठेवले जात आहे. महसूल पथकातील तलाठी आणि कर्मचारी जीवाचे रान करून अवैध रेती तस्करी रोखत असतानाच, जप्त वाहने तहसील कार्यालयातूनच गायब होणे ही गंभीर बाब मानली जात आहे. अधिकारी आणि कर्मचारी यांच्या संगनमताचा संशय नागरिकांमध्ये व्यक्त होत असून, शासन वा प्रशासन यातून कोण जबाबदार हे न सुटणारे कोडे निर्माण झाले आहे. दर्यापूर तहसील कार्यालयातील सलग चोरीच्या घटनांनी महसूल विभागातील सुरक्षा व्यवस्थेचा अभाव अधोरेखित करत प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

**जनतेत रोष ‌ पालकमंत्र्यांकडून कारवाईची मागणी**

अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अशा घटनांवर तातडीने लक्ष घालावे, अशा मागण्या नागरिकांकडून होत आहेत. वारंवार जप्त वाहने गायब होण्यामुळे महसूल विभागाच्या विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह लागले आहे.


> “अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तहसील कार्यालयात सुरक्षारक्षक अथवा चौकीदाराचे पद रिक्त आहे. तसेच सौर ऊर्जा अभावी पथदिवे बंद असल्याने परिसर अंधारमय होता.
>
> **रविंद्र कानडजे, तहसीलदार, दर्यापूर**

> “तहसील कार्यालयाचे हस्तांतर आम्ही दोन ते तीन महिन्यांपूर्वीच पूर्ण करून हस्तांतरण रिपोर्ट तहसील कार्यालयास दिला आहे. मात्र, त्यांच्याकडून हस्तांतरण प्राप्तीचा रिपोर्ट अद्याप प्राप्त झालेला नाही.
>
> **महेंद्र धनबर, उपविभागीय अभियंता, सांबा दर्यापूर**

# 2 किलो 800 ग्रॅम गांजासह एक जेरबंद

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 4)** - गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी नागपूरी गेट पोलीस स्टेशन हद्दीत मोठी कारवाई करत शेख अफजल शेख असगर (40, रा. छायानगर, अमरावती) याला अटक केली. त्याच्या ताब्यातून 2 किलो 800 ग्रॅम गांजा, एक शाईन मोटारसायकल, तसेच मोबाईल फोन असा एकूण 1,66,000 किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुन्हे शाखेला अफजल हा परिसरात अंमली पदार्थांची वाहतूक व विक्री करत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार 4 डिसेंबर रोजी पथकाने सापळा रचून त्याला थांबवून तपासणी केली. तपासणीदरम्यान त्याच्या ताब्यात मोठ्या प्रमाणात गांजा आढळून आला. आरोपीला ताब्यात घेऊन मुद्देमालासह नागपूरी गेट पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. या प्रकरणी पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू असून गुन्हे शाखेच्या या कारवाईचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.



# रामा गावातील दोन मंदिरांच्या दानपेट्या फोडल्या

## सीसीटीव्हीत कैद झाले चोर; दुपारीच घेतला हात साफ

**अमरावती, (दि. 4)**- वलगाव पोलिस ठाणे हद्दीतील रामा गावात असलेल्या हनुमान मंदिर आणि गजानन मंदिरातील दानपेट्या मोपेडवर आलेल्या दोघा चोरट्यांनी फोडून अंदाजे 15 ते 20 हजार रुपये लंपास केले. ही घटना 2 डिसेंबर रोजी दुपारी 3 ते 5.30 वाजताच्या दरम्यान घडली. चोरीची संपूर्ण घटना ग्रामपंचायतीच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाली आहे. शेतकरी प्रमोद शेषराव जुनघरे (वय 65) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

रामा गावातील गजानन महाराज आणि हनुमान मंदिरात दररोज भाविकांची मोठी गर्दी असते. 2 डिसेंबर रोजी दुपारी दोन चोर मोपेडवर आले. गजानन महाराज मंदिरातील दानपेटी त्यांनी थेट उचलून नेली, तर हनुमान मंदिरातील दानपेटीतून त्यांनी रोख रक्कम चोरली. दोन्ही मंदिरांच्या दानपेट्यांतून मिळून 15 ते 20 हजार रुपये चोरीस गेल्याची माहिती आहे. ही घटना भरदिवसा घडल्यामुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तक्रारदार प्रमोद जुनघरे यांच्या फिर्यादीवरून वलगाव पोलिसांनी दोन अज्ञात आरोपींच्या विरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.



# मेळघाटात 'तपासणी अभियान' सुरू

महासागर | प्रतिनिधी




**अमरावती, (दि. 4) :** मेळघाटातील मूलभूत सुविधांबाबत सातत्याने होत असलेल्या तक्रारींवर उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली असून, पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे, बंड्या साने आणि डॉ. कुलपे यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी झाल्यानंतर 11 आयएएस अधिकाऱ्यांचे उच्चस्तरीय पथक आज मेळघाटात दाखल होत आहे. न्यायालयाने या पथकाला 18 डिसेंबरपर्यंत प्रत्यक्ष पाहणीचा सविस्तर ग्राउंड रिपोर्ट सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यांतील आदिवासी भागांमध्ये रस्ते, वीज, पाणी आणि आरोग्य सेवांची कमतरता गंभीर स्वरूपात कायम असल्याची बाब वारंवार पुढे येत आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार तीन विभागांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा मोठा ताफा आजपासून मेळघाट दौऱ्यावर रवाना झाला आहे. एकूण 11 आयएएस अधिकारी या प्रत्यक्ष पाहणी मोहिमेत सहभागी आहेत.

पथक बिहाली, सेमाडोह, कलमखार, कटकुंभ आणि चुर्णी या गावांमधील आरोग्य सेवा, अंगणवाडी केंद्रे, रस्त्यांची स्थिती तसेच इतर मूलभूत सुविधांची पाहणी करणार आहे. या पथकात विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, आरोग्य विभागाच्या आयुक्त कादंबरी बलकवडे, स्वच्छता विभागाचे सहसचिव डॉ. बापू पवार, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, आयुक्त कैलाश पगारे, जिल्हा परिषद सीईओ संजिता महापात्रा, मुख्य वनसंरक्षक ज्योती बॅनर्जी आणि इतर वरिष्ठ अधिकारी सहभागी आहेत.

आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे आणि महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुप यादव हेही मोठ्या ताफ्यासह मेळघाटात दाखल होत आहेत. संबंधित विभागातील अनेक अधिकारी गुरुवारी दुपारपासूनच अमरावतीत पोहोचले आहेत.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अधिकाऱ्यांनी ग्रामीण पायाभूत सुविधा आणि आरोग्य यंत्रणेची प्रत्यक्ष स्थिती तपासून त्याचा सविस्तर अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. विशेष म्हणजे, याचिकाकर्त्यांनाही पाहणीदरम्यान उपस्थित राहण्याची कोर्टाने परवानगी दिली असून, पद्मश्री डॉ. कोल्हे, बंड्या साने आणि डॉ. कुलपे हेही या दौऱ्यात सहभागी होत आहेत.

## 11 आयएएस अधिकाऱ्यांचा आजपासून प्रत्यक्ष दौरा

## मेळघाटच्या समस्यांकडे उच्च न्यायालयाचा धडाका

## 18 डिसेंबरपर्यंत 'ग्राउंड रिपोर्ट' सादर करण्याचे निर्देश

### दौऱ्याचे वेळापत्रक

- सकाळी 11.30 : अंगणवाडी, बिहाली तपासणी
- सेमाडोह प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट
- लवाडा अंगणवाडी आणि धारणी उपजिल्हा रुग्णालय पाहणी
- दुपारी 3.00 : आशा-अंगणवाडी कार्यकर्त्यांशी संवाद
- दुपारी 4.00 : कलमखार व बैरागड प्राथमिक आरोग्य केंद्रांची पाहणी
- स्वतंत्र मार्ग : अचलपूर उपजिल्हा रुग्णालय कटकुंभ, चुर्णी ग्रामीण रुग्णालय भेट; स्थानिकांशी संवाद

# चारित्र्यावर संशय घेत केली पत्नीची हत्या

## खैरी पारधी बेड्यावरील घटना




महासागर | प्रतिनिधी

**अचलपूर, (दि.4)** - तालुक्यातील मौजा खैरी पारधी बेड्यावर पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन पतीने तिची हत्या केली. हत्येनंतर लपून बसलेल्या पतीला पोलीसांनी अटक केली.

जानराव उर्फ ज्ञान्या भोसले (वय 35) हा पत्नी सबाना जानराव भोसले (वय 32) हिच्यावर सातत्याने चारित्र्यावरून संशय घेत असे. त्यामुळे दोघांमध्ये कायम वाद होत असत. बेड्यातील कोणी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला तर त्यांना शिवीगाळ व मारहाणीची धमकी देण्याचा त्याचा पिढलेला स्वभाव असल्याने परिसरात दहशत निर्माण झाली होती. यापूर्वी पत्नीच्या आई-वडिलांनाही मारहाण करून घराबाहेर त्याने हाकलल्याची माहिती आहे.

शुक्रवार 3 डिसेंबर 2024 रोजी रात्री 10 ते 12 दरम्यान झालेल्या वादात आरोपीने सबानावर बांबूच्या काठीने चेहरा, छाती, पाठ, मांडी आणि पोटरीवर बेछूट मारहाण केली. गंभीर जखमी झालेल्याचा सबानाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. दाम्पत्याला दोन लहान मुले आहेत. माहिती मिळाल्यानंतर पोलिसांसह फॉरेन्सिक पथक आणि फिंगरप्रिंट तज्ज्ञांना बोलावून पंचनामा व पुरावे गोळा करण्यात आले. खून करून सकाळी पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या आरोपीला गावाचे पोलिस पाटील धनश्री दीपक काळे यांच्या मदतीने आसेगाव पोलिसांनी ताब्यात घेतले. आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# ‘गुलाल आपलाच’, ‘फिक्स नगरसेवक’, ‘मीच मैदान मारणार’, ‘बाजी आमचीच’

महासागर | प्रतिनिधी

**पथ्रोट, (दि. 4)**– नगराध्यक्षपद आणि नगरसेवकांचे भवितव्य मतदानयंत्रात बंद झाल्यानंतर, तसेच काही न्यायालयीन बाबींमुळे निकाल लांबणीवर गेल्याने शहरात आणि परिसरात विविध तर्कङ्कवितर्कांना उधाण आले आहे. ‘गुलाल आपलाच’, ‘फिक्स नगरसेवक’, ‘मीच मैदान मारणार’, ‘बाजी आमचीच’ अशा घोषणा उमेदवारांच्या गोटांतून सुरू आहेत; तर सर्वसामान्य मतदारांत साधकङ्कबाधक चर्चा अधिकच रंगू लागल्या आहेत.

## उमेदवारांचे दावे

शेवटच्या टप्प्यात झालेल्या अर्थपूर्ण प्रचारामुळे अनिश्चितता अधिक वाढली आहे. तुतारी निनादणार का? कमळ फुलणार का? बाण अचूक लक्ष्य भेदणार का? की विधानसभेप्रमाणेच अमरावती जिल्ह्यातील नगरपरिषदांमध्ये पुन्हा कमळच फुलणार? याबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.



प्रत्यक्षात दुरंगी आणि तिरंगी लढतीची चर्चा असून, इतर उमेदवारांना मिळणारी मतेही निकालावर परिणाम करणारी ठरणार आहेत. मात्र त्यांना किती मते मिळतील यावर राजकीय धुरीणांमध्ये मोठी मतमतांतरं आहेत. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, दोन्ही शिवसेना आणि भाजपकडून संपूर्ण विजयाचा दावा करण्यात येत असला तरी, प्रतिपक्षांकडून त्यांची समीकरणे फोल असल्याचे प्रतिवाद केले जात आहेत.

भाजपची फिक्स वोट बँक असल्याचा मुद्दा मांडला जात असतानाच, दर्यापूर विधानसभेत शिवसेना (उबाठा) विजयी झाली, हेही तितक्याच जोरात सांगितले जात आहे. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी स्वतंत्र लढल्याने मतविभागणी झाली असून, महाविकास आघाडीची मते कायम असल्याचा दावा त्यांच्याकडून केला जातो. कमळच फुलणार, असे ठाम दावे करत विजयाची विविध गणिते मांडली जात आहेत. निवडणुकीत विकासाचा मुद्दा आणि नागरी प्रश्नांना दुय्यम ठरवून सभाङ्करॅलींचा धडाका झाला असला, तरी अंतिम टप्प्यात जवळपास सर्वच उमेदवारांनी प्रत्यक्ष गाठीभेटी आणि अर्थपूर्ण प्रचारावर भर दिला. त्यामुळे मतदारांचा कल अचूक ओळखणे कठीण झाले आहे. यामुळे निवडणूक निकालाबाबत आजतरी छातीठोकपणे कुणीच काही सांगू शकत नाही, अशी स्थिती पथ्रोट परिसरात निर्माण झाली आहे.

# बेनोडा शहीद ग्रामपंचायतीकडून कर सवलत योजना अन्यायी!




## नियमित करदात्यांमध्ये नाराजीची भावना

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, (दि.4)**– बेनोडा शहिद ग्रामपंचायतीने कर भरल्यास थेट 50 टक्के सवलत देण्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. विशेष म्हणजे, ही सवलत फक्त थकीत नव्हे तर चालू कर धारकांनाही लागू राहणार असल्याचे ग्रामपंचायतीने स्पष्ट केले आहे.



या निर्णयामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या थकीत करदारांना दिलासा मिळणार असला, तरी गेल्या अनेक वर्षांपासून नियमितपणे कर भरणाऱ्या नागरिकांमध्ये नाराजीची भावना तीव्र होताना दिसत आहे. ग्रामपंचायतीच्या या योजनेने ‘नियमित करदारांच्या प्रामाणिकपणाचे महत्त्व काय?’ हा प्रश्न गावभर चर्चेचा विषय ठरला आहे. येथील नागरिक मनोहर बारमासे यांनी या निर्णयाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, आम्ही अनेक वर्षे वेळेवर कर भरतो. मात्र आता थकीतांना 50 टक्के सूट आणि आम्हालाही समान सवलत देणे म्हणजे नियमित करदारांचा अवमानच आहे. आमच्या प्रामाणिकपणाला कोणतेही प्रोत्साहन नाही. गावातील अन्य नागरिकांनीही समान भावना व्यक्त करत, नियमित करदारांसाठी स्वतंत्र प्रोत्साहन योजना जाहीर करण्याची मागणी केली आहे. ग्रामपंचायतीने थकीत कर वसुली वाढवून आर्थिक स्थैर्य निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू केला असला, तरी नियमित करदारांचा विश्वास कायम ठेवण्यासाठी संतुलित पावले उचलण्याची गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. सवलत योजनेमुळे गावात एकीकडे दिलास्याची भावना तर दुसरीकडे अन्यायाची भावना अशा मिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

# निकाल पुढे ढकलल्यामुळे उमेदवाराचे ब्लडप्रेशर वाढले!

## शहराचे राजकीय तापमानही वाढले

**विलास पाटील**

**वरुड, (दि.4)** – नगरपरिषद निवडणुकीचा निकाल जाहीर करण्याची तारीख पुढे ढकलल्याने शहरातील राजकीय वातावरणात अचानक उसळी आली आहे. प्रशासनाने आता 21 डिसेंबर ही नवी तारीख निश्चित केली असली, तरी मतदारांपासून ते उमेदवारांपर्यंत सर्वांच्याच मनात सस्पेन्स अधिकच गडद होत आहे.

निवडणुकीत दिसलेल्या उत्साहानंतर निकाल जाहीर होण्यात झालेला विलंब नागरिकांना अप्रिय ठरत आहे. लोकशाही व्यवस्थेत वेळेवर आणि पारदर्शकपणे निकाल जाहीर होणे अपेक्षित असते. मात्र, येथे किंतु-परंतु वाढत असल्याने शहरात विविध चर्चा, शंका आणि राजकीय अर्थलक्षणांना उधाण आले आहे. उमेदवारांचे आणि कार्यकर्त्यांचे ‘गणित’ पुन्हा मांडले जात आहे. कोणता पक्ष आघाडीवर असेल, कोण पिछाडीवर जाईल, यावर अंदाज, चर्चा आणि अफवांचे सावट पसरत आहे. मतदारांच्या मनातल्या एकाच प्रश्नाला जोर मिळू लागला आहे—धडा कोणाला मिळणार आणि नगरपरिषदेचे नेतृत्व कोणाच्या हाती जाणार? 21 डिसेंबर हा दिवस केवळ निकालाचा नसून शहराच्या राजकीय दिशेला आकार देणारा ठरणार आहे. दरम्यान, परिस्थिती अशी आहे की निकालाआधीच उमेदवारांची ‘ब्लडप्रेशर’वाढले आहे. लोकशाही प्रक्रियेचा सन्मान राखण्यासाठी निकालाचा विलंब हा अपवाद रहायला हवा. प्रशासनाने तातडीने स्पष्टता देऊन नागरिकांमध्ये निर्माण झालेली अनिश्चितता दूर करणे ही काळाची गरज आहे. कारण लोकशाहीत गुप्तता नव्हे, तर पारदर्शकता अधिक महत्त्वाची असते.

# सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे कॅन्सरची दुर्मिळ, जटिल शस्त्रक्रिया यशस्वी

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.4)** – स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) येथे कॅन्सरची अतिशय गुंतागुंतीची आणि दुर्मीळ शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली. विशेष म्हणजे स्टर्नोटॉमी करून अशा प्रकारची शस्त्रक्रिया रुग्णालयात प्रथमच करण्यात आली.

सदर रुग्ण 60 वर्षीय महिला असून त्या अचलपूर येथील रहिवासी आहेत. रुग्णाच्या मेडियास्टिनम (छातीच्या मध्यभागी) स्थित गाठीवर ही महत्त्वपूर्ण शस्त्रक्रिया करण्यात आली. या जागी हृदय, मोठ्या रक्तवाहिन्या, श्वासनलिका, अन्ननलिका आणि थायमस यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या अवयवांचे अस्तित्व असल्यामुळे शस्त्रक्रिया अत्यंत जटिल मानली जाते. तज्ञ डॉक्टरांच्या समन्वयातून आणि अचूक नियोजनातून ही



प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली. कॅन्सर तज्ञ व हृदयरोग तज्ञ या दोन्ही विभागातील डॉक्टरांनी संयुक्तपणे शस्त्रक्रिया करून रुग्णास नवीन जीवनदान दिले. ही शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत विनामूल्य करण्यात आली. ही प्रक्रिया रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे आणि विशेष कार्याधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कॅन्सर तज्ञ डॉ. अतुल यादगिरे, हृदयरोग तज्ञ डॉ. सुधीर धांडे, बधिरीकरण तज्ञ डॉ. सचिन गोंडाने, डॉ. रमनिका ढोमणे, डॉ. रोहिणी राठोड, डॉ. माधुरी गाडेकर आणि डॉ. किरण पारिसे यांनी शस्त्रक्रियेचे नेतृत्व केले. अधीसेविका चंदा खोडके यांच्या समन्वयासह इन्चार्ज सिस्टर संगीता आष्टेकर, कविता बेरड, प्रियंका गायकवाड, वैष्णवी मरकाडे, सुमित्रा कोरे, वैभवी कोथळकर, जिमी कांबळे, लक्ष्मण वाळूकर, अथर्व लोंढे, शारदा राठोड आणि जीवन तेलमोरे यांनी शस्त्रक्रिये दरम्यान महत्वपूर्ण सहकार्य केले.

# पुण्यातील महात्मा फुले वाड्याचे खाजगीकरण थांबवावे

## जिजाऊ ब्रिगेडची तहसीलदारांना निवेदनाद्वारे मागणी

महासागर | प्रतिनिधी

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, (दि.4)** – पुणे येथील ऐतिहासिक महात्मा फुले वाडा खाजगीकरणाच्या दिशेने नेण्याचा शासनस्तरीय प्रस्ताव तत्काळ मागे घेण्याची मागणी जिजाऊ ब्रिगेडतर्फे करण्यात आली. यासंदर्भात 3 डिसेंबर रोजी अंजनगाव सुर्जी येथील तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.




मंत्री छगन भुजबळ यांनी महात्मा फुले वाडा भाडेतत्त्वावर समता परिषदेकडे चालविण्यास देण्याची मागणी केल्याची माहिती पुढे येत आहे. या प्रस्तावाला जिजाऊ ब्रिगेडने तीव्र विरोध दर्शवित, महात्मा फुले वाडा हा देशाचा ऐतिहासिक ठेवा असून तो कोणत्याही जातीपुरता मर्यादित नसल्याचे निवेदनात नमूद केले आहे. महात्मा फुले हे सर्व समाजाचे प्रेरणास्थान आहेत; त्यामुळे त्यांची कर्मभूमी खाजगी मालमत्तेसारखी वागवू नये, अशी विनंती संघटनेने केली.

शासन आणि पुरातत्त्व विभाग वाड्याचे संवर्धन व देखभाल समर्थपणे करू शकतात, असा विश्वास व्यक्त करून या परिसराचे खाजगीकरण अथवा भाडेतत्त्वावरील कोणतीही परवानगी देऊ नये, अशी ठाम भूमिका निवेदनात मांडण्यात आली. राज्यभरातील जिजाऊ ब्रिगेडच्या महिला कार्यकर्त्यांनी सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनाही यासंदर्भात निवेदने पाठविली आहेत.

सध्या वाडा सर्वसामान्यांसाठी मुक्तपणे उपलब्ध असून, महिला जयंतीङ्कपुण्यतिथीनिमित्त येथे येऊन महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करतात. हा महिलांसाठी हक्काचा आणि भावनांशी निगडित असा सांस्कृतिक ठेवा आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे खाजगीकरण महिलांच्या भावनांना धक्का देणारे ठरेल, असे ब्रिगेडतर्फे स्पष्ट करण्यात आले.

या मागणीची दखल न घेतल्यास संपूर्ण महाराष्ट्रभर आंदोलन उभारण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. निवेदन देताना तालुकाध्यक्ष सारिका मानकर, प्रदेश अध्यक्षा सीमा बोके, विभागीय कार्याध्यक्ष मीना कोल्हे, सुषमा कोकाटे, सोनल निमकाडे, शितल बोके, जयश्री देशमुख, प्राजक्ता सरोदे व मीनाक्षी घुबडे उपस्थित होत्या.

# टायटन्स पब्लिक स्कूलचा लौकिक वाढवणारी कामगिरी

## राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत तिसरे स्थान

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, (दि.4)** – सातारा-कोल्हापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय 17 वर्ष वयोगटातील बास्केटबॉल स्पर्धेत विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीच्या टायटन्स पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी तिसरे स्थान पटकावत दमदार कामगिरी साकारली. नागपूर (59-58) आणि नाशिक (67-43) संघांवर प्रभावी विजय मिळवत संघाने विजेतेपदाच्या शर्यतीत आपली छाप उमटवली.

संघाचा स्टार खेळाडू पारस विजय विटाळकर याने प्रत्येक सामन्यात 30 ते 40 गुणांची आतषबाजी करत संघाच्या यशात निर्णायक योगदान दिले. नैतिक देशमुख, राज चौखडे, वंश राठी, यश पलसपगार, हरतेज मथारू, अर्चित खंडार,



सोहम धोटे, दीपक जेना आणि अमितेश गुजर असे खेळाडू संघात होते. प्रशिक्षक निलेश फुलंबरकर यांनी मार्गदर्शन केले. या कामगिरीनंतर सोसायटीचे डॉ. नितीन धांडे, ॲड. उदय देशमुख, प्रा. (डॉ.) हेमंत देशमुख आदी पदाधिकाऱ्यांनी संघाचा सत्कार केला. पारस विटाळकरची राष्ट्रीय स्पर्धेसाठी सलग तिसऱ्यांदा निवड होणे ही शाळेसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

# महामानवांना संगीत, कॅन्डल रॅलीची भावपूर्ण श्रद्धांजली

## सम्यक युवा बहुउद्देशीय संघटनेतर्फे महापरिनिर्वाण दिनाचे विशेष आयोजन

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, (दि.4)**– राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले आणि विश्वरत्न, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सम्यक युवा बहुउद्देशीय संघटना, वरुडतर्फे विविध श्रद्धांजली उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ज्ञान, समता आणि मानवतेचे अधिष्ठान असलेल्या या महामानवांच्या स्मृतीदरम्यान बहुजन समाजात उत्स्फूर्त तयारी सुरू असून, सर्वांनी सहभागी होऊन महामानवांच्या कार्य व सामाजिक परिवर्तनाच्या विचारांना अभिवादन करावे, असे आवाहन संघटनेने केले आहे. समता-न्याय-बंधुतेच्या संदेशाने वरुड शहर उजळून निघणार आहे.

### ‘वंदन बा भिमा’ संगीतमय स्वरांजली

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात 5 डिसेंबर रोजी संध्याकाळी 6 वाजता ‘वंदन बा भिमा’ हा संगीतमय कार्यक्रम होत आहे. तेजस तायवाडे व सहकारी यांचे सुमधुर सादरीकरण ज्ञान, समता व सामाजिक जागृतीचा संदेश देणार असून बहुजन समाजासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

### श्रद्धांजली व कॅन्डल रॅली

शनिवारी 6 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 9 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिदिनानिमित्त श्रद्धांजली समारोह होणार आहे. सायंकाळी 6 वाजता भव्य कॅन्डल रॅली काढण्यात येणार असून, उज्वल भारतासाठी बाबासाहेबांच्या विचारांची ज्योत जनमानसात प्रज्वलित ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला जाणार आहे.


## जाहिरात

जन्म प्रमाण पत्र मिळने बाबत सुंदरबाई चंपालाल मावस्कर रा. खापरखेड़ा ता. धारणी यांचा जन्म दिनांक 15/06/1981 रोजी गांव खापरखेड़ा ता. धारणी येथे झालेला आहे. या बाबत ग्राम पंचायतमध्ये नोंद नाही परंतु यांना जन्म दाखल्याची आवश्यकता आहे. करिता कोनाला या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी 30 दिवसात आक्षेप दाखल करावे. सदर प्रसिद्धि ग्रामपंचायत खापरखेड़ा ता. धारणी येथे नोटिस बोर्ड वर लावण्यात आली आहे.

**सुंदरबाई चंपालाल मावस्कर**

## नाम परिवर्तन की सूचना

मैं नर्गिस बानो अब्दुल अज़ीज़ खान हूँ और लालखड़ी, अमरावती की निवासी हूँ। मेरे स्कूल छोड़ने के प्रमाण पत्र और निवास प्रमाण पत्र में मेरा नाम नर्गिस बानू अब्दुल अज़ीज़ खान लिखा है। और बाकी सभी दस्तावेज़ों में मेरा नाम मेरे पति के नाम के साथ नर्गिस बानो अब्दुल कलीम भी है। लेकिन मेरा असली नाम नर्गिस बानो अब्दुल अज़ीज़ खान है, जो मेरी शादी से पहले का नाम है। लेकिन अब शादी के बाद और भविष्य में मुझे नर्गिस बानो अब्दुल कलीम के नाम से जाना जाएगा। वर्तमान में मेरा स्थायी पता है- कुरेशीपुरा, परतवाड़ा, ता, अचलपुर, जिला. अमरावती 444805 (महाराष्ट्र)। मैंने एक हलफनामे के ज़रिए अपने नाम में यह बदलाव करवाया है। इसकी पूरी जिम्मेदारी मेरी होगी।

दिनांक – 13/11/2025 | **हस्ताक्षर**

स्थान – परतवाडा | **नर्गिस बानो अब्दुल कलीम**

## जाहीर नोटीस

जाहीर नोटीस देण्यात येते की गाव मौजा लोणी गुरव तालुका खामगाव जिल्हा बुलढाणा येथील लोणी गुरव मोजे गट क्रमांक 218 एकूण क्षेत्रफळ 51 हेक्टर 73 आर असे आहे सदर शेत हेअशोक कलेक्टीव फार्मिंग सोसायटी शहापूर या नावाने आहेव त्याचा अध्यक्ष म्हणून सूर्यभान यमाजी तिडके हे आहेत सदरशेत सूर्यभान यमाजी तिडके हे सोसायटीचेअध्यक्ष आहेत यांनी सदरशेत विकण्याचा सौदा केलेला आहे सदर शेत कुशल चौधरी वअविनाश दादा अजिंक्य दादा ह्या तिघांनी विकत घेतलेला आहे सदरशेत सूर्यभान यमाजी तिडके यानी संतोष सिद्धार्थ तिडके विकी विजय इंगळे प्रभाकर तुळशीराम इंगळे यांच्या समक्ष सदर शेताची इसार चिठी करून दिलेली आहे अध्यक्ष यांनी म्हणण्याप्रमाणे की सदर शेतावरील सातबारा वरील संपूर्ण नावाची माझ्या नावाने शेत विकण्याची सर्व संमती आहे व सर्वांच्या माझ्याकडे सह्या आहेत ज्या दिवशी शेत खरेदी करायचे आहे त्यादिवशी मी सर्वांना खरेदी करण्याकरता हजर ठेवीन वरील सौदा आम्ही विकत घेतलेला आहे याबद्दल कोणाची काही इसार चिठ्ठी या टोकन पावती या उसनावर पावती केली असेल तर त्यांनी 31 दिवसाच्या आत खालील पत्त्यावर व मोबाईल नंबर वर आमच्याशी संपर्क करावा 31 दिवसाच्या आत कोणती तक्रार आली नाही तर वरील वर्णनाचा शेतीचा सौदा आम्ही विकत घेण्यास तयार राहू व आपली तक्रार ग्राह्य धरल्या जाणार नाही

शिक्का

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
**कुशल चौधरी**
**चैतन्य कॉम्प्लेक्स डीपी रोड, ता. अंजनगाव सुर्जी**
**जि. अमरावती 444705**
**मो.न 9561614111/9067254111**


# नराधम आरोपीला फाशीची मागणी

## तहसीलदार व ठाणेदारांना निवेदन

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, (दि.4)**– चांदूर बाजार पोलीस स्टेशन हद्दीतील शिरजगाव बंड येथे 56 वर्षीय इसमाने सहा वर्षीय बालिकेवर बिस्किटाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याची धक्कादायक घटनेचा सर्वत्र निषेध होत आहे. सर्व स्तरातून आरोपीला फाशी देण्याची मागणी केली जात आहे. त्यासंदर्भातील निवेदन तहसीलदार आणि ठाणेदारांना देण्यात आले. निवेदन देताना विविध सर्वपक्षीय महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांमध्ये सुरेखा ठाकरे, स्टेला, सुनीता झिंगरे, वनमाला गणेशकर, मंदा चव्हाण, देशमुख, वर्षा ढाले, सरिता पाथरे, पल्लवी खैरकर, अर्चना लेंडे, स्वाती बलिंगे, उषा बंगाले, रेखा यादव, शहनाज परवीन, संजीवनी अविनसे, आयशा खान, आशा वानखडे, फातिमा बानो साकीम, तसेच गोपाल भालेराव, रमण लंगोटे, मधुसूदन पारिसे, ऋषिकेश रडके, तेजस वानखडे, श्रेयश बर्वे, करण खंडारे, संविधान मोहोड यांचा समावेश होता.





90 च्या दशकात अनेक कुटुंबांत मुलीचा जन्म दु:ख मानला जायचा, तर आज मुली जन्माला येणं म्हणजे भीती वाटू लागली आहे. सगळे भाऊ-बहिण ही लहानपणापासून मनात रुजलेली भावना आज प्रश्नचिन्हाखाली आली आहे. पाच वर्षांच्या मुलीने कुणाला काका, दादा किंवा आजोबा म्हणावं की नाही, यावरही संशयाची छाया पडू लागली आहे. नात्यांच्या पवित्रतेची झालेली ही गळचेपी अत्यंत चिंताजनक आहे. या विकृत मानसिकतेविरुद्ध समाजातील प्रत्येकाने आवाज उठवणे गरजेचे आहे. केवळ तक्रारी करून नाही, तर ठोस भूमिका घेऊन सुरक्षित, समान आणि विश्वासू भारत निर्माण करणे ही आजची वेळेची मागणी आहे.

**राधिका देशमुख, चांदूर बाजार.**



झालेली घटना ही अमानवी स्वरूपाची असून या संदर्भात पोलीस विभागाने तातडीने लवकरात लवकर दोषी आरोपीला कठोरातील कठोर शिक्षा देण्यासाठी पावली उचलले पाहिजे. तसेच आरोपीला फाशी कशी होईल याकडे पोलिसांनी तपास करणे आवश्यक आहे. तेव्हाच अशा प्रकारची विकृती असणारा लोकांची डोके ठिकाणावर येईल.

**सुनीता झिगरे, शिरजगाव कसबा.**




झालेली घटना ही मन सुन्न करणारी आहे. आपल्या नात, मुलीच्या वय असलेल्या मुलीबाबत अशा प्रकारची भावना निर्माण कशी होते ही घृणास्पद आहे. अशा लोकांना सगळ्या समोर ठोकायला पाहिजे तेव्हाच अशा वृत्ती च्या लोकांना कळेल. आम्ही या घटनेचा निषेध करतो.

**सुरेखा ठाकरे, अमरावती.**



आरोपीला अटक करण्यात आली पण राज्य सरकारने कायद्यात बदल करून अशा लोकावर कारवाई करण्यासाठी अशा स्वरूपाचे घटना फास्टट्रॅक न्यायालयात चालवणे गरजचे आहे. जेणेकरून पीडित मुलीला न्याय मिळेल आणि कायद्याची ताकद अशा विकृत लोकांना कळेल.

**अर्चना लेंडे, चांदूर बाजार.**



अशा लोकांना कठोरातील कठोर शिक्षा झाली पाहिजे. समाजात अशा घटना घडणे म्हणजे संतापजनक बाब आहे, आम्ही या घटनेचा निषेध करून आरोपीला लवकरात लवकर शिक्षा व्हावी अशी मागणी करतो.

**फातिमा बानो, चांदूर बाजार.**

RNINO-46975/1985 | Dainik Mahasagar Amravati

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504. Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ | महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक



## दुर्मिळ विकारावर मात!

'सोशल मीडिया'वर सध्या एक घटना व्हायरल होत आहे. ही घटना आहे युकेमधील यॉर्कशायर येथील रहिवासी झारा हार्टशॉर्न हिची. तिला लोक प्रेमाने नाही, तर तिची खिल्ली उडवत आजी म्हणून हाक मारतात. वयाने लहान असलेल्या झाराच्या चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्यामुळे तिची त्वचा निस्तेज झाली होती. झारां लहानपण फार कठीण होतं. ती शाळेत जायची, तेव्हा इतर विद्यार्थी तिला चिडवायचे आणि "आजी आली, आजी आली" असं म्हणायचे. झारा घराबाहेर निघाल्यानंतर लोक तिला वाईट प्रकारे बघायचे. एवढंच नाही तर, आईची मोठी बहीण असंदेखील म्हणायचे.

**दहा लाख लोकांमध्ये एकाला आजार**

झाराला एक दुर्मिळ आजार आहे. लिपोडिस्ट्रॉफी असं त्या आजाराचं नाव आहे. हा आजार दहा लाख लोकांमध्ये एकाला होतो. यामुळे व्यक्ती त्याच्या वास्तविक वयापेक्षा खूपच मोठी दिसते. झाराची आई ट्रेसी हिलाही हा विकार होता, परंतु तिची लक्षणं सौम्य होती. झाराचा जन्म झाल्यानंतर डॉक्टरांनी सांगितलं, मुलगी निरोगी जन्माला आली, पण झारा चार वर्षांची झाल्यानंतर तिची स्किन लटकू लागली. वयाच्या ८ व्या वर्षी ती साठ वर्षांच्या वृद्धासारखी दिसू लागली होती. तिच्याशी कोणीही बोलत नव्हतं. तिला असंही वाटायचं की तिच्याशी कोण लग्न करेल. लिपोडिस्ट्रॉफीमुळे पीडित व्यक्तीचं केवळ शरीरच विद्रूप होतं असं नाही, तर त्यांचं हृदय, यकृत आणि मूत्रपिंडदेखील खराब होतात. झारा केवळ १४ वर्षांची असताना तिच्या मूत्रपिंडांना त्रास होऊ लागला. मग, वयाच्या १६ व्या वर्षी, एक चमत्कार घडला. जेव्हा झाराची व्यथा माध्यमांमध्ये आली आणि डॉक्टरांनी तिला पाहिलं, तेव्हा त्यांनी सांगितलं, की आम्ही तिच्यावर शस्त्रक्रिया करू.

शस्त्रक्रिया झाल्यानंतर झाराची तीन किलोची अतिरिक्त चरबी काढली. जेव्हा झाराच्या चेहऱ्यावरून पट्ट्या काढल्या गेल्या, तेव्हा तिच्या आईला अश्रू अनावर झाले. शस्त्रक्रियेनंतर ती एका सामान्य तरुणीसारखी दिसत होती. तिच्या आईनेही शस्त्रक्रिया केली आणि आता दोघीही सामान्य जीवन जगत आहेत.

# कॅलिडोस्कोप

## 'या' शहरात दोन महिने अंधार

तुम्हाला माहिती आहे का, की पृथ्वीवर एक असे शहर आहे, जिथे सूर्य २-२ महिने उगवतच नाही?



सुमारे ४६०० लोकसंख्या असलेल्या या शहरात १८ नोव्हेंबर रोजी यंदाचा शेवटचा सूर्यास्त झाला आहे. म्हणजे येथे सूर्य अधिकृतपणे मावळला आहे. आता सूर्य थेट २२ जानेवारी २०२६ पर्यंत पुन्हा उगवणार नाही. हे शहर आहे अलास्का. याचं नाव उत्कियाग्विक शहर आहे. हे शहर यापूर्वी बैरो म्हणून ओळखलं जायचं. आर्क्टिक वर्तुळाच्या उत्तरेकडे सुमारे ४८३ किलोमीटर अंतरावर वसलेले हे शहर बराच काळ अंधारात राहणार आहे. कारण उत्तर गोलार्ध सप्टेंबर आणि मार्च दरम्यान सूर्यापासून दूर होणार आहे. ज्यामुळे अत्यंत उत्तरेकडील अक्षांशावर दिवसाचा प्रकाश हळूहळू कमी होत जातो आणि डिसेंबर किंवा संक्रांतीच्या सुमारास तो आपल्या शिखरावर पोहोचतो.

ध्रुवीय रात्रीदरम्यान येथील परिस्थिती अत्यंत कठोर असते. तापमान वारंवार शून्य डिग्री फॅरनहाइटपेक्षाही खाली जाते आणि सूर्य न उगवल्यामुळे येथे राहणाऱ्या लोकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. नंतर हळूहळू वसंत ऋतू येतो, तसे दिवसाचा उजेड परत येऊ लागतो. तसेच मे महिन्याच्या मध्यापर्यंत परिस्थिती पूर्णपणे उलट होते. त्या वेळेपासून ते ऑगस्टच्या सुरुवातीपर्यंत सूर्य मावळत नाही. म्हणजे या कालावधीत येथे २४ तास दिवसाचा उजेड राहतो.

**दक्षिण ध्रुवावर ६ महिने सतत चमकतो सूर्य**

दक्षिण ध्रुवावर ही घटना आणखीच नाट्यमय असते. आर्क्टिकमधील शहरे अनेक आठवडे अंधारात राहतात तर दक्षिण ध्रुवावर सुमारे सहा महिने सतत सूर्य चमकत राहतो. आर्क्टिकमध्ये अंधार असतो, तेव्हा दक्षिण ध्रुवावर सूर्यप्रकाश असतो आणि जेव्हा आर्क्टिकमध्ये मध्यरात्री सूर्य चमकतो, तेव्हा दक्षिण ध्रुव आपल्या अर्धवार्षिक रात्रीच्या आघोषात बुडालेला असतो.



## दुधापासून कपडे?

दूध नासल्यानंतर तुम्ही खराब म्हणून फेकून देता, त्याच दुधापासून डिझायनर साडी, कुर्ते आणि फॅशनेबल आऊटफिट तयार केले जातात. ऐकायला हे विचित्र वाटले, परंतु दुधापासून कपडे तयार करण्याची इंडस्ट्री सध्या चर्चेत आहे. या कपड्यांना मिल्क फॅब्रिक म्हणतात. हा कपडा दिसायला रेशमासारखा मुलायम आणि परिधान करण्यासाठी खूपच आरामदायी असतो. दुधापासून तयार होणारे कपडे आता थंडीपासूनही बचाव करत आहेत.

एक लिटर दुधापासून फक्त दहा ग्रॅम मिल्क फायबर बनते. म्हणजे साधारण एका टी-शर्टला तयार करण्यासाठी साठ-सत्तर लिटर दुधाची गरज लागते. त्यामुळेच हे फॅब्रिक खूपच महाग आहे आणि केवळ प्रीमियम ब्रँड्स याचा वापर करू शकत आहेत. यामुळे मार्केटमध्ये मिल्क फॅब्रिकची किंमत गगनाला भिडलेली आहे. एक मीटर फॅब्रिकची किंमत सुमारे १५ हजार रुपये ते ४५ हजार रुपये आहे. त्यामुळे एक साडी घ्यायची झाली तर तीन ते पाच लाख रुपयांचा खर्च येतो.

जग वेगाने सस्टेनेबल फॅशनकडे वळत आहे. लोक आता प्लास्टिकपासून तयार झालेले पॉलिएस्टर सोडून निसर्गाचे नुकसान न होता तयार होणारे फॅब्रिक निवडत आहेत. याच विचारातून मिल्क फॅब्रिकचा जन्म झाला. याचे पूर्ण श्रेय जर्मनीच्या 'क्यूमिल्क' या इनोव्हेटीव्ह कंपनीला जाते. 'क्यूमिल्क' हा साधा ब्रँड नाही. ही कंपनी ताजे दूध न वापरता इंडस्ट्रीयल वेस्ट मिल्कचा वापर करते. खराब झालेले लाखो टन दूध फेकून दिले जाते. एकट्या युरोपात सुमारे २० लाख टन दूध दरवर्षी खराब होते. आणि या खराब दुधाला 'क्यूमिल्क' कंपनी अमूल्य फॅब्रिकमध्ये रुपांतरीत करते.

**इतिहास खूप जुना**

इटलीत १९३० मध्ये दुसऱ्या जागतिक युद्धाच्या वेळी लोकरीचा तुटवडा झाला होता. तेव्हा इटलीच्या संशोधकानी दुधाच्या प्रोटीनपासून धागा तयार केला. त्याचे नाव 'लानिटाल' ठेवले. लाना म्हणजे लोकर आणि इटलीतून तयार केले म्हणून लानिटाल.

## वाहतूक पोलिसाच्या भ्रष्टाचाराचा डोंगर!

उपप्रादेशिक परिवहन विभाग आणि पोलिसांवर नेहमीच भ्रष्टाचाराचे आरोप होतात. एका वाहतूक पोलिसाने १०८० कोटींचा भ्रष्टाचार केला. त्याच्या घरी धाड पडली, तेव्हा सापडलेले घबाड पाहून तपास अधिकाऱ्यांना धक्काच बसला. १५ कोटींची रोकड, ५२ किलो सोने, २३४ किलो चांदी, अनेक मालमत्तांची कागदपत्रे तसेच अनेक अलिशान कार त्याच्याकडे सापडल्या.

भोपाळमध्ये १०८ कोटी २५ लाख रुपयांच्या मनी लॉड्रिंग घोटाळा उघडकीस आला होता. लोकायुक्त पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात माजी कॉन्स्टेबल सौरभ शर्मा याच्याकडे कोट्यवधी रुपयांची मालमत्ता सापडली. भोपाळमध्ये पार्क केलेल्या एका कारमधून ५२ किलो सोने आणि २३४ किलो चांदीही जप्त करण्यात आली होती. लोकायुक्तच्या विशेष पोलिस आस्थापनेने (एसपीई) माजी कॉन्स्टेबल सौरभ शर्मा याच्याशी संबंधित अनेक ठिकाणांमधून मालमत्ता जप्त केल्या. शर्माने दुबईमध्ये गुंतवणूक केली असावी, असे पुरावे प्राप्तिकर आणि लोकायुक्त पथकांना सापडले होते.

सौरभ शर्मा हा ग्वाल्हेरचा रहिवासी आहे. त्याचे वडील तुरुंगात डॉक्टर होते. त्याने अवघ्या सात वर्षांत प्रचंड संपत्ती कमावली. २०१७ मध्ये, वडिलांच्या मृत्यूनंतर सौरभला वाहतूक विभागात कॉन्स्टेबल म्हणून अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळाली. त्यानंतर काही दिवस ग्वाल्हेरमध्ये तो कार्यरत होता. एका चौकीवर त्याची नियुक्ती झाली. हळूहळू, त्याने मंत्री आणि अधिकाऱ्यांशी संबंध वाढवले. चौक्यांवर जमा होणाऱ्या पैशांचा तो हिशेब ठेवू लागला. त्यानंतर सौरभ भोपाळमध्ये स्थायिक झाला. सौरभची पत्नी दिव्या सौरभचा व्यवसाय सांभाळायची. पेट्रोल पंप, क्रशर, जमीन आणि




सोन्यातील गुंतवणुकीत दिव्याचे नाव समोर येत आहे. सौरभ शर्माने दोनदा एमपीपीएससी परीक्षा दिली आणि मुख्य परीक्षेतही पोहोचला. एकदा तो मुलाखतीच्या फेरीतही पोहोचला.

सौरभ शर्माचे घर भोपाळच्या अरेरा कॉलनीत आहे. घरातून वाहने आणि इतर वस्तू पोलिसांनी जप्त केल्या होत्या. त्यांची किंमत २२ कोटी आहे. हिरे आणि सोन्याचे दागिने ६२ लाख रुपये किमतीची रोख रक्कम देखील जप्त करण्यात आली. शिवाय, सौरभच्या ऑफिसमधून एक कोटी रुपये रोख आणि २३४ किलो चांदी जप्त करण्यात आली. त्याची किंमत पोलिसांनी दोन कोटी असल्याचे सांगितले आहे. सात नोटा मोजण्याच्या मशीन देखील सापडल्या. भोपाळच्या शाहपूर बी सेक्टरमध्ये वीस हजार चौरस मीटरच्या भूखंडावर सौरभ एक शाळा बांधत असल्याचे प्राप्तिकर अधिकाऱ्यांना समजले. पथकाला अनेक बेहिशेबी मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे देखील सापडली आहेत. त्याची चौकशी सुरू आहे. भोपाळच्या मंदोरी गावात एका इनोव्हा कारमधून २४ किलो सोने आणि अंदाजे दहा कोटी रुपये जप्त करण्यात आले होते.

## जखम चक्क फेविक्किकने चिटकवली!

मेरठमधील दोन वर्षांच्या मुलाबाबतच्या वैद्यकीय निष्काळजीपणामुळे आरोग्य व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. जागृती विहार एक्सटेंशनच्या महापाल हाइट्समध्ये राहणारे वित्त व्यावसायिक जसप्रिंदर सिंग यांचा मुलगा मनराज सिंग याला घरी खेळत असताना डोळ्याजवळ खोल जखम झाली. कुटुंब घाबरले आणि त्यांनी भाग्यश्री रुग्णालयात धाव घेतली, परंतु तेथे जे घडले ते सर्वांना धक्कादायक आणि अस्वस्थ करणारे होते. रुग्णालयातील डॉक्टरांनी जखमेवर



टाके मारण्यास नकार दिला. ते म्हणाले, टाक्यांमुळे मुलाच्या चेहऱ्यावर व्रण राहील. म्हणून त्यांनी पाच रुपयांचे फेविक्किक आणले आणि ते जखमेला लावून पट्टी बांधली. डॉक्टरांनी मुलाच्या डोळ्याजवळील कापलेल्या भागावर फेविक्किक लावताच, दोन वर्षांचा मनराज वेदनेने ओरडला. डॉक्टरांनी त्याकडे दुर्लक्ष केले, कारण ते मुलाच्या भीतीमुळे होते, असे त्यांचे म्हणणं होते. कुटुंबाला मुलाची प्रकृती गंभीर असल्याचा संशय आला. रात्रभर वेदना वाढतच राहिल्या आणि दुसऱ्या दिवशी सकाळी एक धक्कादायक सत्य उघड झाले. वेदना कमी होण्याऐवजी वाढतच गेल्या. जखमेजवळ फेविक्किकचा एक कडक थर झाला. सकाळी मनराजला तेथील दुसऱ्या रुग्णालयात नेण्यात आले. तेथील डॉक्टर निष्काळजीपणामुळे स्तब्ध झाले. फेविक्किक काढण्यास जवळजवळ तीन तास लागले. या काळात, मूल वेदनेने ओरडत राहिले. अडकलेला भाग काळजीपूर्वक काढून टाकल्यानंतर, डॉक्टरांनी जखमेवर उपचार केले आणि चार टाके घातले. बराच वेळानंतर मूल बरे झाले. निष्काळजीपणामुळे व्यथित झालेले वडील जसप्रिंदर सिंग आधीच्या रुग्णालयात गेले आणि डॉक्टरांकडून उत्तरे मागितली.

## हौसेला मोल नसतं



लग्न, हनिमून या प्रत्येकाच्या आयुष्यातल्या महत्त्वाच्या घटना असतात. लग्न आणि हनिमून अविस्मरणीय व्हावा असा अनेक जोडप्यांचा प्रयत्न असतो. इंग्लंडमधल्या एका जोडप्यानेही असंच काही तरी केलं. मध्यंतरी भारतीय दक्षिण रेल्वेने नुकतीच एक विशेष ट्रेन सुरू केली होती. त्यावेळी इंग्लंडमधल्या एका नवपरिणित जोडप्याने आपल्या हनिमूनसाठी ही संपूर्ण ट्रेन आरक्षित केली. ही ट्रेन पहिल्यांदा आरक्षित करण्याचा मान त्यांना जातो. ३० वर्षांचा ग्रॅहम विलियम लिन आणि २७ वर्षांची सिल्विया यांनी प्लासिक निलगिरी पर्वतरांगांमध्ये हनिमून साजरा करायचं ठरवलं. यासाठी त्यांनी मेत्तुपलयम ते उधगमंडलम या दरम्यान त्यांनी संपूर्ण ट्रेन आरक्षित केली होती. हौसेला मोल नसतं असं म्हणतात. त्यामुळे ग्रॅहम आणि सिल्विया यांनी हात अजिबात आखडता घेतला नाही. एका मार्गाच्या प्रवासासाठी त्यांनी तब्बल तीन लाख रुपये खर्च करून ही ट्रेन आरक्षित केली आणि पर्वतरांगांमधून प्रवासाचा आनंद लुटला. या नवपरिणित जोडप्याचं स्थानकांवर स्वागतही करण्यात आलं. पर्यटनाला बळकटी देण्यासाठी ही ट्रेन सुरू करण्यात आली आहे. या ट्रेनमध्ये १२० प्रवासी बसू शकतात. या संपूर्ण ट्रेनमधून या दोघांनी प्रवास केला. हा अनोखा हनिमून त्यांच्या आयुष्यभर स्मरणात राहील.

## गवत खाणारा शार्क



गाय, म्हशी, हरण यासारखे प्राणी गवत खातात. पण शास्त्रज्ञांनी गवत खाणाऱ्या शार्क माशाच्या प्रजातीचा शोध लावला आहे. हा शार्क मासा सगळं काही खातो. अगदी गवत खायलाही तो कमी करत नाही. अर्थात हे गवत समुद्री गवत आहे. बोनहेड शार्क असं या प्रजातीचं नाव आहे. या माशाचं ६० टक्के अन्न समुद्री गवत आहे. कॅलिफोर्निया विद्यापीठ आणि फ्लोरिडा आंतरराष्ट्रीय विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी बोनहेड शार्कच्या खाण्यापिण्याच्या सवयींचा अभ्यास केला. बोनहेड ही हॅमरहेड शार्कच्या सर्वात लहान प्रजातींपैकी एक आहे. हा मासा खेकडे, झिंगे तसंच छोट्या माश्यांना खाऊन टाकतो. तो समुद्री गवतही खातो. या अभ्यासासाठी संशोधकांनी पाच बोनहेड शार्कचा वापर केला. या शार्कना समुद्री गवत आणि विशिष्ट प्रजातीचा मासा खायला दिला. त्यावेळी या माश्यांनी गवत खाल्लं आणि त्यांना ते सहज पचलं. या संशोधनादरम्यान या शार्कचं वजनही वाढलं. शार्क मासे मांसाहारी असतात हे आजवर माहित होतं. पण शार्कच्या काही प्रजाती गवतही खातात हे ऐकून धक्का बसल्याचं या शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.

## त्याने चोरले कीटक!

सर्वसाधारणपणे चोर मौल्यवान रत्नं, दागदागिने, पैसे, महागड्या गाड्या आणि इतर सामान चोरतात. एखाद्या संग्रहालयातून किटक चोरून नेल्याचं आपण ऐकलं नसेल. पण फिलाडेल्फियातल्या किटक संग्रहालयातून चोराने किटक चोरून नेला आहे. चोराने जगातल्या सर्वात विषारी अशा कोळ्याची चोरी केली. यासोबतच त्याने इतरही काही किटक चोरले आहेत. त्यात दुर्मीळ प्रजातीच्या विंचवांचा समावेश आहे. या संग्रहालयात ७००० पेक्षा जास्त किटक आहेत. त्यांच्यातलाच हा एक कोळी होता. विशेष म्हणजे ही चोरी रात्री-अपरात्री नाही तर



दिवसाढवळ्या झाली. इथल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी ही घटना आणि चोराला टिपलं. चोर एका गाडीत निळ्या रंगाचा प्लास्टिक कंटेनर ठेवत असल्याचं या कॅमेऱ्यात कैद झालं आहे. त्यानंतर तो गाडी घेऊन पळून गेला. या किटकांपैकी हा विषारी कोळी अत्यंत दुर्मीळ समजला जातो. त्याची किंमत प्रचंड आहे. हा कोळी तब्बल ४० हजार डॉलर एवढ्या किमतीचा आहे. सँड स्पायडर असं या विषारी कोळ्याच्या प्रजातीचं नाव आहे. त्याला सहा डोळे असतात. सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. संग्रहालयाच्या कर्मचाऱ्यांचं हे काम असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

## 'एआय बॉट' ची कमाल, नोकऱ्यांची धमाल!




'एआय'ची ताकद काय असते, याची खरी केस इंटरनेटवर पाहायला मिळाली. एक सामान्य व्यक्ती रात्री झोपली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच्या फोनवर इंटरव्ह्यू कॉल्सची लाइन लागलेली दिसली! त्याने स्वतःसाठी तयार केलेल्या सुपर-इंटेलिजंट 'एआय बॉट'ने रातोरात एक हजार नोकऱ्यांसाठी अर्ज केले. त्यामुळे त्याला जास्त मेहनत न घेता असंख्य जॉब्सचे इंटरव्ह्यू कॉल आले.


'रेडिट'वरील 'गेट एम्प्लॉईड फोरम'वर या व्यक्तीने आपला अनुभव लिहिला. त्याने सांगितले, की त्याने असा 'एआय बॉट' तयार केला आहे, जो जॉब डिस्क्रिप्शन वाचतो. त्यानुसार त्याच्या प्रोफाइलशी जुळणारा रेझ्युमे आणि कव्हर लेटर तयार करतो आणि नंतर आपोआप अर्जही सबमिट करतो. त्याने लिहिले, मी शांत झोपलो होतो आणि माझा बॉट माझ्यासाठी 'इंटरव्ह्यू' गोळा करत होता. एका महिन्यात ५० हून अधिक कंपन्यांनी मला प्रतिसाद दिला.''

सगळ्यात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे प्रत्येक नोकरीसाठी वेगळा रेझ्युमे आणि कव्हर लेटरही 'एआय बॉट'ने तयार करून दिले. यामुळे 'एचआर मॅनेजर्स'चे लक्ष लगेच वेधले जाते. त्या व्यक्तीने एक महत्त्वाचा प्रश्नही उपस्थित केला, की भविष्यात नोकरीची संपूर्ण प्रक्रिया ऑटोमेटेड होणार का? सगळे बॉट्स करत असतील, तर मानवी कनेक्शन कुठे उरणार? आजच्या काळात ही चर्चा अधिकच तापत चालली आहे. सोय वाढली आहे; पण विश्वास आणि मानवी संवादाचा ठसा कमी होणार का, याची चिंता अनेकांना भेडसावत आहे.

'एआय' आता केवळ चॅटबॉट्स किंवा माहिती देणारे टूल्स राहिलेले नाहीत. ते नोकरी शोधण्याच्या प्रक्रियेला नवीन वेग देत आहेत. निश्चितच काही आव्हाने आहेत, पण या व्यक्तीची कथा इंटरनेटवर लोकांना आश्चर्यचकित करत आहे.

## शापित मंदिर!

राजस्थानातल्या बाडमेरपासून ३० किलोमीटर अंतरावर किराडू नावाचं छोटंसं गाव आहे. या गावात एक मंदिर आहे. या मंदिरावरूनच या गावाला किराडू हे नाव पडलं आहे. अकराव्या शतकात किराडू हे परमार राजघराण्याची राजधानी होती. पण आता इथे साम सूम असते. या परिसराबद्दल जाणारी व्यक्ती किराडू हे नाव ऐकल्यावर थरथरून जाते. आख्यायिकेनुसार हे मंदिर शापित असल्याचं बोललं जातं. किराडूबद्दल अनेक कथा सांगितल्या जातात. त्या ऐकल्यावर कोणालाही आश्चर्याचा धक्का बसेल. या मंदिराच्या आसपास राहणारे लोक इथले अपशकुन आणि शापाबद्दल सांगतात. या मंदिराच्या बाहेर भली मोठी शिळा आहे. इथले लोक याबद्दल एक आख्यायिका सांगतात. त्यानुसार एका कुंभारिणीला ऋषींना शाप दिला होता. या शापामुळे ती शिळा बनली असं म्हटलं जातं. या मंदिरात संध्याकाळनंतर कोणीही जात नाही. सर्व ठिकाणी कुलुपं लावली जातात. संध्याकाळनंतर इथे थांबणारी व्यक्ती दगड होते असं म्हटलं जातं. या मंदिरातले सगळे दगड एके काळी माणूस होते असं इथल्या लोकांचं म्हणणं आहे. भूकंपामुळे या मंदिराची बरीच हानी झाली होती. इथे फार कोणी येत नसल्याने मंदिराची देखरेखही झाली नाही. किराडूमध्ये पाच मंदिरं आहेत. त्यापैकी विष्णू आणि सोमेश्वराची मंदिरं सुस्थितीत आहेत. खरं खोटं कोणाला माहीत नसलं तरी इथे कोणीही विषाची परीक्षा बघत नाही. हे मंदिर म्हणजे एक कोडंच आहे.



# निकालानंतर महायुती तुटणार?

■ **महासागर प्रतिनिधी,नागपूर, दि.४ :**
मला २ तारखेपर्यंत युती टिकवायची आहे, असे वक्तव्य करून भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी महायुतीत काहीच आलबेल नसल्याचे सूतोवाच केले होते. त्यांनी या वक्तव्यानंतर कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही. तर भाजपच्या नेत्यांनी त्यांचे वक्तव्य त्या अर्थाने नव्हते अशी सारवासारव केली. महायुतीत पक्ष वाढीवरून वाद उफळल्याचे दिसून येत आहे.

नगरपालिका, नगरपरिषद निवडणुकीतच या दोन्ही पक्षातील वरिष्ठ एकमेकांवर नाराज असल्याचे दिसून येत आहे. अशातच महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डोंबिवलीत सुरू असलेले फोडाफोडीचे राजकारण काही थांबण्याचे चिन्हे नाहीत.

३ नोव्हेंबरला शिवसेना शिंदे गटातील पदाधिकाऱ्यांनी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केला. ठाणे जिल्ह्यातील फोडाफोडीवरून शिंदे नाराज असल्याची चर्चा असतानाच शिंदेंच्या निकटवर्तीयांनाच भाजपात घेतल्याने महायुतीमधील तणाव वाढण्याची शक्यता आहे.




या सर्व प्रकरणात भाजप नेते आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे. ते प्रसार माध्यमांसोबत बोलत होते.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण ऐन निवडणुकीच्या रणधुमाळीत काय बोलतायेत हे संपूर्ण महाराष्ट्राने ऐकले आहे. रवींद्र चव्हाणांच्या या वक्तव्याने महाराष्ट्रात वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे. रवींद्र चव्हाण नेमक्या काय अर्थाने बोलले हे तेच सांगू शकतील. पण निवडणूक प्रचारात महायुतीच्या मित्र पक्षांनी एकमेकांवर टीकेचा भडीमार सुरु केला आहे. ठिकठिकाणी मित्रपक्ष एकमेकांची उणीदुणी काढताना दिसत आहेत.

एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे मंत्री आणि नेते भाजपवर टीकेचे बाण सोडत आहेत. त्या पार्श्वभूमीवर रवींद्र चव्हाण यांनी केलेले वक्तव्य हे भाजपने मित्र पक्षांना दिलेला इशारा तर नाही ना अशी चर्चा सुरु झाली आहे.

**काय म्हणाले बावनकुळे?**

राज्य निवडणूक आयोगाला निवडणुकीचा घोळ सुरू आहे. यासाठी आयोगाला चार पत्र पाठवलेले आहे. नाना पटोले यांना प्रत्येक गोष्टीत राजकारण करायचे ती बाब वेगळी आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या भूमिके विरोधात आम्ही पत्र देऊन आमची भूमिका मांडली आहे. या अनुषंगाने पुढे काय करता येईल ते बघू निवडणुका पुढे ढकलायला जाणे चूक आहे. कामठीमध्ये बनावट मतदान झाल्याचा आरोप होत आहे. यावर बावनकुळे म्हणाले की, प्रत्येकाचा तो अधिकार आहे. आमची त्यामध्ये काही हरकत नाही. काही गैरप्रकार झाला असेल तर न्यायालय त्यामध्ये निर्णय देईल.

रविंद्र चव्हाण यांच्या वक्तव्यावर बावनकुळे म्हणाले की, स्थानिक निवडणुकीचा तो विषय होता. स्थानिक परिस्थिती कशी राहील यासंदर्भात २ तारखेला निर्णय घेऊ असे चव्हाण म्हणाले. त्यांचा संदर्भ काय होता हे विचार न करता भ्रम पसरवीला जात आहे, असेही बावनकुळे म्हणाले

## माजी मंत्री भारतभाऊ बोंद्रे यांचे निधन

### बुलढाणा जिल्ह्याच्या सिंचन क्रांतीत मोलाचे योगदान

■ **महासागर प्रतिनिधी बुलढाणा, दि. ४ :**
महाराष्ट्राच्या सिंचन क्षेत्रात मोलाची कामगिरी करणारे आणि 'जलपुरुष' म्हणून ओळखले जाणारे राज्याचे माजी मंत्री भारतभाऊ बोंद्रे यांचे आज निधन झाले. चिखली येथे वयाच्या ८४ व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांनी अखेरचा श्वास घेतला.



भारत भाऊ बेंद्रे यांनी बुलढाणा जिल्ह्याच्या सिंचन क्रांतीत मोलाचे योगदान दिले होते. त्यांच्या निधनाने बुलढाणा जिल्ह्यासह संपूर्ण राज्याच्या राजकीय वतुर्ळात शोककळा पसरली असून, शरद पवार यांचा एक जुना आणि अत्यंत विश्वासू शिलेदार म्हणून त्यांची ओळख होती.

भारतभाऊ बेंद्रे १९७२ मध्ये पहिल्यांदा चिखली विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. त्यानंतर १९८० ते १९९५ अशी सलग १५ वर्षे त्यांनी या मतदारसंघाचे निर्विवाद प्रतिनिधित्व केले. एकंदरीत चार वेळा आमदारकी भूषवतानाच त्यांनी राज्याच्या मंत्रिमंडळात पाटबंधारे, उद्योग आणि शिक्षण यांसारख्या महत्त्वाच्या खात्यांचे मंत्रिपद सांभाळले.

**सिंचन प्रकल्पांचे शिल्पकार**

शेतकऱ्याला पाणी मिळाले तरच तो समृद्ध होईल, हे सूत्र घेऊन भारतभाऊंनी काम केले. पाटबंधारे मंत्री असताना त्यांनी बुलढाणा जिल्ह्याच्या सिंचन क्षमतेत आमूलाग्र बदल घडवून आणले.

जिल्ह्यातील खडकपूर्णा प्रकल्प, पेनटाकळी प्रकल्प आणि महत्त्वाकांक्षी जिगाव प्रकल्पाचे ते खऱ्या अर्थाने प्रणेते होते. याशिवाय कोराडी आणि नळगंगा यांसारख्या अनेक लहान-मोठ्या जलप्रकल्पांना त्यांनी मंजुरी मिळवून दिली आणि त्यांना गती दिली. त्यांच्या या दूरदृष्टीमुळे आणि जलसंधारणातील योगदानामुळेच त्यांना राज्यात 'जलपुरुष' म्हणून गौरवले जात होते.

गेल्या काही दिवसांपासून भारतभाऊ आजारांनी त्रस्त होते. चिखली येथील डॉ. तायडे यांच्या रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र, उपचारादरम्यानच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात बराच मोठा आप्तपरिवार आहे. कृषी सिंचन क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान कधीही विसरता येणार नाही, अशा भावना विविध स्तरांतून व्यक्त केल्या जात आहेत.

## अमरावतीचे मॉडेल रेल्वे स्टेशन हटवू देणार नाही

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ४ :**
अमरावतीचे मॉडेल रेल्वे स्थानक हटवू न देण्याचा निर्धार खासदार बळवंतराव वानखडे यांनी व्यक्त केला आहे. त्याचवेळी स्थलांतराचा प्रस्ताव सादर करणाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही केली.

खासदार बळवंत वानखडे यांनी दिल्लीत रेल्वेमंत्री अश्वीनी वैष्णव यांची भेट घेतली. यावेळी ही मागणी करण्यात आली. या प्रकरणात केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने तातडीने हस्तक्षेप करून जनभावनांचा आदर करावा, अशी अपेक्षा खासदारांनी व्यक्त केली आहे.

अमरावती रेल्वे स्थानकाचा विस्तार, नवीन गाड्या, यार्ड विकास व प्रवासी सुविधांसाठी विशेष योजना मंजूर करावी, रेल्वेची जमीन कमी करून कोणत्याही प्रकारचा व्यापारी प्रकल्प



होणार नाही, याची लेखी हमी द्यावी, अशा पुरक मागण्या नोंदवतानाच यापूर्वी मंत्री नितीन गडकरी यांना भेटून बंद केलेला पूल सेतूबंध योजनेमधून बांधण्याची मागणी नोंदवल्याचेही त्यांनी वैष्णव यांच्या लक्षात आणून दिले. शिवाय त्यासाठी राज्य शासनाकडून केंद्र सरकारने प्रस्ताव मागवण्याची विनंती केल्याचेही सांगितले.

माजी राष्ट्रपती प्रतीभाताई पाटील यांच्या कार्यकाळात अमरावतीत मॉडेल रेल्वे स्टेशन तयार करण्यात आले आहे. गेल्या काही महिन्यांपूर्वी करण्यात आलेले खासगी स्ट्रक्चरल ऑडिट, उड्डाणपुल अचानक बंद करणे, दुरुस्तीला विलंब, परिणामी निर्माण झालेला वाहतुकीचा गोंधळ, या सर्व घडामोडी स्थानक हटवण्याचा मार्ग मोकळा करण्याचाच भाग असल्याचा संशयही खासदारांनी व्यक्त केला.

वाहतुकीसाठी महत्त्वाचा असलेल्या रेल्वे स्थानक चौक-राजकमल चौक उड्डाणपुलाची दुरुस्ती तातडीने सुरू करावी अशी मागणी करीत मॉडेल रेल्वे स्टेशन हटवू देणार नसल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

## बनावट आरएमडी, विमल गुटख्याचा कारखाना पोलिसांकडून उद्ध्वस्त

### एक कोटींचा मुद्देमाल जप्त, चौघांना अटक

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ४ :**
पुणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेने लोणीकाळभोर पोलीस ठाणे हद्दीतील कांबळे वस्ती, थेऊर फाटा येथे मोठी कारवाई केली आहे. येथे बनावट आरएमडी आणि विमल पान मसाला गुटखा तयार करणारा अवैध कारखाना उद्ध्वस्त करण्यात आला. या कारवाईत सुमारे एक कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, चार जणांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी सुमित गुप्ता याच्या गोदामावर छापा टाकला. या ठिकाणी बनावट सुगंधित तंबाखू, सुपारी, थंडक पावडर, केमिकल, गुलाबजल, प्रिंटेड पाऊच, बॉक्स आणि पोती असा मोठ्या प्रमाणात कच्चा माल आढळून आला. गोदामाशेजारील शेतातही तयार गुटखा आणि कच्चा माल मोठ्या प्रमाणात सापडला.

जप्त करण्यात आलेल्या एकूण मुद्देमालाची किंमत सुमारे १ कोटी रुपये आहे. यात बनावट गुटख्याच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली तीन विशेष बदललेली वाहनेही जप्त करण्यात आली. यामध्ये दोन गोल्डन रंगाच्या टोयोटा इनोव्हा आणि एक काळ्या रंगाची टाटा नेक्सॉन यांचा समावेश आहे. या वाहनांची अंदाजे किंमत ५० लाख रुपये असून, १ लाख ३० हजार रुपये रोख रक्कमही जप्त करण्यात आली.

या प्रकरणी कारखान्याचा मालक रोहित दुर्गाप्रसाद गुप्ता (वय २५, रा. पत्र वस्ती, थेऊर) आणि तीन कामगार रामप्रसाद ऊर्फ बापू बसंता प्रजापती (वय ५०), अप्पू सुशील सोनकर (वय ४६) व दानिश मुसाकीन खान (वय १८) यांना घटनास्थळी ताब्यात घेण्यात आले. गोदामाचा मालक सुमित गुप्ता मात्र फरार असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त पंकज देशमुख, उपायुक्त (गुन्हे) निखील पिंगळे, सहाय्यक आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, सहाय्यक निरीक्षक नितीनकुमार नाईक, उपनिरीक्षक अस्मिता लाड आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली. पथकातील राजस शेख, संदीप जाधव, पृथ्वीराज पांडुळे, दत्तात्रय खरपुडे यांनी केली.

## आता लायसन्ससाठी गुणवत्तापूर्ण चाचणी

■ **महासागर प्रतिनिधी अकोला, दि. ४ :**
रस्त्यावरील अपघातांपैकी सुमारे ८० टक्के पेक्षा अधिक अपघात चालकाच्या निष्काळजीपणामुळे होत असल्याचे परिवहन विभागाने स्पष्ट केले. त्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने जबाबदार व कुशल चालक निर्माण करण्यासाठी अनुज्ञप्ती चाचणीमध्ये व्यापक फेरबदल करून गुणवत्ता वाढविण्यात आली आहे.

सर्व कार्यालयात एकसमान चाचणी पद्धती लागू करून चाचणीचे चित्रीकरण आवश्यक केले. पक्की अनुज्ञप्ती चाचणीत उत्तीर्ण झालेल्यांपैकी पाच टक्के अर्जदाराची पुनर्चाचणी देखील घेतली जाणार आहे. प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी मार्गदर्शक तत्वे परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी जारी केले.

रस्ते अपघात, मृत्यू हानी कमी करण्याची जबाबदारी परिवहन विभागाची असल्याने रस्ता सुरक्षा धोरणाच्या माध्यमातून राज्यातील सर्व प्रादेशिक, उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांना पक्की अनुज्ञप्ती चाचणी संदर्भात १२ मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. पक्क्या अनुज्ञप्तीच्या चाचणीसाठी सारथी ४.० या संगणकीय प्रणालीवर उमेदवाराने तारीख व वेळ निश्चित केल्यावर प्रत्यक्ष चाचणीच्या एक दिवस अगोदर प्रत्यक्ष उमेदवाराची स्वाक्षरी व शिक्का घेऊन खात्री केली जाईल.

ड्रायव्हिंग स्कूलमार्फत येणाऱ्या उमेदवाराची चाचणी संबंधित संस्थेच्या वाहनावरच घेण्यात येऊन वाहनाच्या वैध कागदपत्रांची नोंद होणार आहे. पक्की अनुज्ञप्ती चाचणी घेतल्या जाणाऱ्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करणे आवश्यक केले. त्यासाठी रस्ता सुरक्षा, डीपीडीसी किंवा कार्यालयीन निधीतून ते उभारावे लागतील.

३० दिवसाच्या आत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने गुणवत्तायुक्त व कौशल्यापूर्ण चालक तयार होण्यासाठी प्रत्येक अर्जदाराची चाचणी केंद्रिय मोटार वाहन नियम १९८९ मधील नियम १५ नुसार काटेकोरपणे घेऊन सर्व तरतुदींचे पालन करणे सक्तीचे केले.

पक्क्या अनुज्ञप्तीसाठी वाहन चाचणी घेताना उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन न केल्यास संबंधित अधिकाऱ्यांविरूद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी परिवहन आयुक्त कार्यालयास प्रस्ताव सादर करण्याचे देखील सूचना देण्यात आल्या आहेत.


## लोकरंजन

### भारतीय चित्रपटाचा पहिला गेमचेंजर व्ही. शांताराम लवकरच मोठ्या पडद्यावर

भारतीय चित्रपटसृष्टीला नवी दृष्टी, नवे तत्त्वज्ञान आणि नवी सौंदर्यभाषा देणारे शांताराम राजाराम वणकुद्रे म्हणजेच व्ही. शांताराम. या महापुरुषाचे असामान्य, प्रेरणादायी आणि वैभवशाली जीवन आता पहिल्यांदाच एका भव्यदिव्य चित्रपटाच्या महाकाव्यातून उलगडणार आहे. स्टुडिओतील साध्या कामगारापासून जागतिक दर्जाची कलाकृती निर्माण करणाऱ्या दिग्दर्शकापर्यंतचा त्यांचा प्रवास म्हणजे धडपड, प्रयोगशीलता, कामाप्रती असलेली निष्ठा आणि कलाप्रेम यांचा दिव्य संगम यात अनुभवायला मिळणार आहे.

झनक झनक पायल बाजे च्या नृत्यवैभवापासून दो आंखें बारह हाथच्या सामाजिक विचारांपर्यंत, व्ही शांताराम यांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे संघर्ष, सर्जनशील ध्यास आणि जग बदलण्याच्या अढळ विश्वासाची उज्ज्वल परंपराच.

आता त्यांचे असामान्य, प्रेरणादायी आणि वैभवशाली जीवन एका मेगा बायोपिकच्या रूपात




मोठ्या पडद्यावर येत आहे. जे व्हिज्युअली ग्रँड, इमोशनली पॉवरफुल आणि सिनेमॅटिकली आयकॉनिक असणार आहे.

व्ही. शांताराम या चित्रपटाचे पहिले पोस्टर नुकतेच प्रदर्शित झाले असून सोशल मिडियावर या पोस्टरने धुमाकूळ घातला आहे. यातील वैभव, भव्यता, दृश्य पाहून प्रेक्षकांमध्ये उत्सुकतेची नवी लाट उसळली आहे.

या चित्रपटात सिद्धांत चतुर्वेदी व्ही. शांताराम यांच्या भूमिकेत झळकणार असून ही भूमिका त्याच्या कारकिदीर्तील एक गेम चेंजर ठरणार आहे.अभिजित शिरीष देशपांडे यांनी या चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन केले असून भव्य दृश्यरचना आणि कलात्मक दृष्टीने त्यांनी या चित्रपटाला एका विशिष्ट उंचीवर नेले आहे.येत्या नवीन वर्षात हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. ■ ■

### 'मॅजिक' चित्रपटात अभिनेता जितेंद्र जोशी एन्काऊंटर स्पेशलिस्टच्या भूमिकेत



आजवर अनेक भूमिकांतून आपल्या अभिनयाची जादू दाखवल्यानंतर आता अभिनेता जितेंद्र जोशी नव्या वर्षात 'मॅजिक' करणार आहे. मॅजिक या सायकोलॉजिकल थ्रिलर चित्रपटात जितेंद्र जोशी एन्काऊंटर स्पेशलिस्टच्या भूमिकेत असून, १ जानेवारीला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर लाँच करण्यात आले आहे.

'आई कुठे काय करते'सारख्या उत्तमोत्तम मालिकांचं दिग्दर्शन केलेल्या रवींद्र विजया करमरकर यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. चित्रपटात जितेंद्र जोशी, सिद्धीरुपा करमरकर, जुई भागवत, प्रियांका पालकर, मयूर खांडगे, अभिजित झुंजारराव, रुपा मांगले, नितीन भजन, गुरुराज कुलकर्णी, योगेश केळकर, प्रदीप डोईफोडे, रसिकराज यांच्या प्रमुख भूमिका आहेत. हा चित्रपट अनेक महोत्सवांमध्ये गौरवला गेला आहे.

मॅजिक या चित्रपटात अरूण राऊत या एन्काऊंटर स्पेशलिस्ट असलेल्या पोलिस अधिकाऱ्याची गोष्ट उलगडण्यात आली आहे. सायकोलॉजिकल थ्रिलर असलेल्या या मॅजिक चित्रपटाची गोष्ट नक्की काय आहे हे जाणून घेण्यासाठी अजून थोडी वाट पहावी लागणार आहे. ■ ■

### ये रिश्ता क्या कहलाता है... मालिकेने गाठला पाच हजार भागांचा टप्पा!

मालिका विश्वात कायम प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणार चॅनल म्हणजे स्टार प्लस! स्टार प्लसवरील आयकॉनिक शो ये रिश्ता क्या कहलाता है ने अभूतपूर्व कामगिरी करत पाच हजार भागांचा टप्पा गाठला आहे. भारतीय टेलिव्हिजनच्या इतिहासात प्रथमच एका डेली फिक्शन शोने इतक्या विलक्षण भागांचा टप्पा गाठला आहे.

मालिकेच्या या ऐतिहासिक क्षणाचा सन्मान म्हणून स्टार प्लस आणि मालिकेच्या टीमने एक खास प्रोमो प्रदर्शित केला असून ये रिश्ता क्या कहलाता है मालिकेच्या पाच हजार भागांचा सुंदर प्रवास यातून अनुभवयाला मिळेल. मालिकेने प्रेक्षकांचे देखील विशेष आभार मानले आहेत. ज्या कुटुंबांनी वर्षानुवर्षे मालिकेला आपल्या घरात स्थान दिले, या प्रत्येक पिढ्यांना जोडून ठेवून त्यांना घरच्या सदस्यांप्रमाणे प्रेम दिले आहे.

या खास प्रोमोची सुरुवात प्रेक्षकांच्या मनात आजही जिवंत असलेल्या हिना खान आणि करण मेहरा यांनी साकारलेल्या अक्षरा आणि नैतिक यांच्या कालातीत प्रेम कहाणीने होते, जिने या मालिकेची भक्कम पायाभरणी केली होती.. ये रिश्ता क्या कहलाता है पाहायला विसरू नका या बुधवारी रात्री ९:३० वाजता. ■ ■



### मराठी रंगभूमीवर एकदा पाहावं करून.. लवकरच रंगभूमीवर!

नातेसंबंधांची कडू-गोड बाजू आणि हलक्याफुलक्या विनोदांचा सुंदर ताळमेळ साधणारे रत्नाकर मतकरी लिखित एकदा पाहावं करून हे नाटक लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. ही कथा अशा दोन पुरुषांची आहे, जे विरुद्ध स्वभावाचे, विचारसरणीचे आहेत आणि ते काही कारणास्तव समोरासमोर येतात. या नाटकाचं वैशिष्ट्य म्हणजे अभिनय क्षेत्रातील अनुभवी तसेच तरुण कलाकारांची मजबूत फळी. भार्गवी चिरमुले, अभिषेक देशमुख, नेहा कुलकर्णी, गौरी महाजन, कृष्णा चतुर्भुज, नामांतर कांबळे, धनश्री दळवी, भूषण पाटील आणि आनंद इंगळे व वैभव मांगले अशा ताकदीच्या कलाकारांनी सजलेले हे नाटक रंगभूमीवर नक्कीच धमाल घडवणार आहे. नाटकातील गंमतीजंमती, घरगुती प्रसंग आणि प्रत्येक पात्रामागची वेगळी भावनात्मक बाजू प्रेक्षकांना हसवत लोटपोट अनुभव देईल. रत्नाकर मतकरींच्या लेखनाची सहजसुंदर शैली आणि विजय केंकरे यांच्या दिग्दर्शनाचा अनुभव यामुळे हे नाटक प्रेक्षकांसाठी विशेष ठरणार आहे. हास्याचे वादळ घेऊन येणारे एकदा पाहावं करून या नाटकाचा शुभारंभ ६ डिसेंबर रोजी पुण्यातील भरत नाट्य रंगमंदिर येथे होईल. ■ ■ ■




: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## राणीच्या बागेतील 'रुद्र' वाघाचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ४ :**
मुंबईच्या भायखळा इथल्या वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान आणि प्राणीसंग्रहालयात शक्ती नावाच्या वाघाचा संशयास्पद मृत्यू झाल्याची माहिती समोर आली होती.



आता त्यानंतर राणीच्या बागेतील रुद्र नावाच्या वाघाचा सुद्धा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. शक्ती आणि करिष्मा यांचा रुद्र हा बछडा होता. राणीच्या बागेतच त्याचा जन्म झाला होता. रुद्रचा इन्फेक्शनमुळे मृत्यू जल्याकगी प्राथमिक माहिती आहे. मात्र मृत्यू अहवाल समोर आल्यावरच नेमके कारण स्पष्ट होऊ शकणार आहे.

रुद्रच्या मृत्यूनंतर शक्ती वाघाचा मृत्यू झाला आहे. मात्र या दोन्ही वाघांच्या मृत्यूचा अहवाल समोर आला नसल्याने नेमके कारण स्पष्ट होत नाही. तसेच जिजामाता उद्यान प्रशासनाकडून देखील याबाबत माहिती देण्यात आली नसल्याचे समोर आले आहे. यामुळे या दोन वाघांच्या मृत्यूचे कारण तसेच माहिती दडवली जात आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, भाजपचे दक्षिण मुंबईचे सरचिटणीस नितीन बनकर यांनी संताप व्यक्त केला आहे. रुद्र वाघाच्या मृत्यूबाबत भूमिका स्पष्ट करण्याची मागणी त्यांनी उद्यान प्रशासनाकडे केली आहे. तसेच पुढील सात दिवसांच्या आत भूमिका स्पष्ट केली नाही तर आंदोलन करण्याचा इशारा नितीन बनकर यांनी दिला आहे.

## निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची बदली

### ईव्हीएमचे सील तोडले

■ **महासागर प्रतिनिधी गोंदिया, दि. ४ :**
जिल्ह्यातील सालेकसा नगरपंचायतची निवडणूक २ डिसेंबर रोजी सर्व केंद्राध्यक्षांनी मतदानाची माहिती सादर करून सीलबंद ईव्हीएम मशीन निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सुपुर्द केल्यानंतर त्या स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यासाठी कंट्रोल युनिटमधील क्लोज बटनची शहानिशा करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी मोनिका कांबळे यांनी ऑन कॅमेरा सील काढायला लावले.

याप्रकरणी जिल्हाधिकारी प्रजीत नायर यांनी सालेकसा नगरपंचायत निवडणूक निर्णय अधिकारी मोनिका कांबळे यांची तडकाफडकी बदली करण्याचे आदेश दिलेत.

## अमरावती-मुंबई विमानसेवा १५ डिसेंबरपर्यंत बंद

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ४ :** ,
राज्यात बदलत्या हवामानामुळे कुठे ढगाळ वातावरण तर कुठे थंडी आहे. अनेक जिल्ह्यांचा पारा घसरल्याने हुडहुडी वाढली आहे. तसेच अनेक ठिकाणी सकाळी धुके पाहायला मिळत आहे. दाट धुक्यामुळे दृश्यमानतेची समस्या निर्माण झाली आहे. या धुक्याचा फटका अमरावती-मुंबई विमानसेवेला बसला आहे. दाट धुक्यामुळे येत्या १५ डिसेंबरपर्यंत विमानसेवा बंद राहणार आहे.



दृश्यमानतेची समस्या

१५ डिसेंबरनंतरही विमानसेवा सुरळीत होणार की नाही हे हवामानावर अवलंबून असेल. मात्र १५ दिवसांहून जास्त काळ विमानसेवा बंद असल्याने प्रवाशांमध्ये नाराजीचा सूर आहे. गेल्या महिन्याच्या सुरूवातीला देखील विमानसेवेला दाट धुक्याचा फटका बसला होता. ३ नोव्हेंबरला अमरावतीच्या विमानतळावर धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्याने विमानसेवा रद्द करण्यात आल्याचे विमानतळ व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले होते.

अलायन्स एअर कंपनीच्या मुंबई -अमरावती मुंबई या विमानसेवेच्या वेळेत बदल झाल्यानंतर विमानसेवा रद्द होण्याचा हा पहिलाच प्रसंग होता, तरी त्यामुळे प्रवाशांना त्रास झाला होता.

विमानसेवेच्या वेळेत गेल्या २६ ऑक्टोबरपासून बदल करण्यात आला आहे. ही विमानसेवा आता आठवड्यातून चार दिवस सुरू करण्यात आली आहे. दर रविवार, सोमवार, बुधवार आणि शुक्रवार या दिवशी सकाळी ७.३० वाजता विमान मुंबईहून उड्डाण घेते आणि सकाळी ८.५० वाजता अमरावती विमानतळावर पोहोचते. त्यानंतर परतीचे विमान सकाळी ९.१५ वाजता मुंबईकडे झेपावते आणि सकाळी १०.३० वाजता मुंबई विमानतळावर पोहचते.

ही विमानसेवा आधी संध्याकाळी होती. ही वेळ गैरसोयीची असल्याने विमानाच्या वेळेत बदल करण्याची मागणी प्रवाशांकडून सातत्याने केली जात होती, त्यामुळे विमान कंपनीने विमानसेवेच्या वेळेत बदल केला आहे.

३ नोव्हेंबरला सकाळी दृश्यमानता कमी मुंबईहून येणारे विमान रद्द करण्यात आले होते. अमरावतीच्या प्रवाशांना आल्या पावली विमानतळावरून परतावे लागले होते. आता १५ डिसेंबरपर्यंत विमानसेवा बंद असल्याने प्रवासाचे नियोजन करणाऱ्यांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. ज्यांनी बुकिंग करून ठेवले, त्यांना विमानसेवा रद्द झाल्याचे संदेश पाठवले जात आहेत. त्यामुळे प्रवाशांना पर्यायी मार्ग शोधावा लागत असून बुकींग झालेल्या प्रवाशांमध्ये नाराजीचा सूर उमटला आहे.